म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 230

पुस्तकाचे नाव - विद्यार्थी.
ले० नाव - गुप्ते, पं०?।०.

REFBK-0019179

विद्यार्थी

आचारांत ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न करणें ह्मणजे आई-बापांच्या व पालकांच्या हक्कावर अतिक्रमण करण्यासारखें आहे. आईबापांच्या इच्छेविरुद्ध कोणतंही वर्तन करावयास मुलांस सांगणें ह्मणजे मुलें व त्यांचे आईबाप यांचेमधील प्रेम कमी करण्याचा प्रयत्न करण्यासारखें आहे. हें मुलास फार घातक आहे. अशाने कुटुंबाचे सुखशांतीचा भंग होण्याचा संभव आहे, आपल्या मताप्रमाणें दुसऱ्यानें वागावें असें आपणास वाटत असेल तर त्याचा प्रयोग अज्ञान, ज्यांस बरें वाईट समजत नाहीं, ज्यांचे विचार अगदीं बाल्यावस्थेंत आहेत, ज्यांस दुनियेचा कांहीं अनुभव नाहीं, ज्यांस कोणती गोष्ट खरी किंवा खोटी हें समजण्या इतका अंगीं शाहाणपणा नाहीं, अशा मुलांवर करूं नये. लहान मुलें व विद्यार्थी आपल्य तरी त्याचा खरोखर कांहीं उपयोग ह

REFBK-0019179

( ३ ) केवळ अमुक माणसा अमुक माणसास अमुक प्रकारचें वर्त ह्मणून त्या प्रकारचें वर्तन अगर आचार जे लोक करूं लागतात; त्या लोकांचें आचरण किति दिवस टिकेल याचा भरंवसा नाहीं. कोणता आचार कां करावा, त्यापासून नफा नुकसान काय आहे, तो खरोखर बरा आहे कीं वाईट आहे, व त्यास कारणें काय आहेत, याचा ज्यांनीं विचार केला नसतो, ते लोक तो आचार केव्हां सोडतील याचा नेम नाहीं. विचार करून आपल्या मनाची खातरी करून जे कोणत्याही प्रकारचे वर्तनाचा स्वीकार करतील त्यांचा नेम पुष्कळ दिवस टिकेल. नाहीं तर गंमत ह्मणून, अगर दुसऱ्याचे भिडेनें किंवा कोणाच्या तरी

आग्रहानें तो वागतो तसें आम्ही वागूं लागलों तर 'तेरड्याचा रंग तीन दिवस राहील'; व जी गोष्ट मनास बाणली नाहीं, जिचें खरें मर्म कळलें नाहीं ती जशी अनायासें सहज आचरणांत आली तशीच सहज सुटून जाईल. नवीन टूम ह्मणून एखाद्या पंथास पुष्कळ लोक अनुकूल होतात. परंतु त्या पंथाचीं तत्वें न कळल्यामुळें कांहीं लोक त्या पंथास कंटाळतात. व आपला पूर्वीचा पंथ स्वीकारतात. अजाण माणसें, अल्पवयी माणसें, ज्यांचे विचार कायम झाले नाहीं असलीं तरुण माणसें, अविचारी माणसें, अत्याचार करणारीं माणसें, व दुसऱ्याचें केवळ अनुकरण करणारीं जीवंत कळसूत्री बाहुलीं कोणत्याही पंथास कितीही मिळाली तरी त्या पंथास जोर येत नाहीं, त्यास स्थायीकपणा आला असें ह्मणतां येणार नाहीं, व तो पंथ असल्या लोकांकडून निरंतर पाळला जाईल असें बिलकूल समजूं नये. असले लोक गोंगाट करतील, धामधूम करतील, कांहीं दिवस अतिशय चळवळ करतील परंतु त्यास विरुद्ध दिशेकडून जरा जरब मिळाली, अगर त्यांचा झोरक्या जरा नरम पडला, अगर त्याचें वजन कमी झालें, व या लोकांस आपल्यावर कांहीं संकट येईल असें वाटलें अगर कांहीं नुकसान होईल असें दिसलें तर यांचा एकदम धीर सुटून जाईल व ते भराभर तो पंथ सोडून ते पळून जातील. असल्या कच्या पायावर कोणत्याही पंथाची इमारत बांधण्याचा प्रयत्न करणें फायदेशीर होणार नाहीं. कोणत्याही नवीन पंथाचा पाया भक्कम घातला पाहिजे. ह्मणजे वरील इमारत डगमगणार नाहीं. आरंभ शूरांच्या हातून फारसें कार्य होत नाहीं.

(४) राजकीय चळवळींत मुलांनीं पडावें किंवा नाहीं असा प्रश्न हल्लीं लोकांपुढें आहे. राजकीय विषय समजण्या इतकी ज्यांची बुद्धि परिपक्व झाली असेल, ज्यांस राजकीय संस्थांचें ज्ञान झालें असेल. ज्यांना त्याबद्दल विचार करण्याची शक्ति आली असेल, त्यांना राजकीय चळवळींत पडण्यास हरकत नाहीं. ज्यांस इतिहासाचें ज्ञान नाहीं, राजकीय हक्क लोकांनीं कसे संपादन केले, कोणी कसे घालविले, राजकीय हक्क मिळण्यास कोणत्या मार्गानें गेले पाहिजे, किती धोरणानें व विचारानें वागलें पाहिजे, हें ज्यांस समजत नाहीं व राजकीय प्रश्नांचा पोक्तपणानें, सर्व बाजूंनीं ज्यांस विचार करण्याइतका आंगीं शाहाणपणा आलेला नाहीं, त्यांनीं राजकीय चळवळींत पडूं नये हेंच चांगलें. कोणत्याही मोठ्या कार्यांत वयाची, लिंगाची, जातीची, वर्णाची इयत्ता नाहीं. परंतु तें कार्य सफल करण्याची ज्यांस शक्ति नाहीं त्यांस त्या कार्यांत पडण्याचा अधिकार नाहीं. ज्यावेळीं मुलांनीं आपला काळ विद्याभ्यासांत घालवावयाचा व विद्या संपादन करावयाची त्यावेळीं त्यांनीं आपला वेळ राजकीय प्रश्नाचा उहापोह करण्यांत घालवूं नये. प्रथम विद्या संपादन करावी. शारिरीक व मानसीक शक्ति वाढवावी, राजकीय विषयांचा विचार करण्यास समर्थ व्हावें. विद्या पुरी करावी, ज्ञानभांडार वाढवावें, शाळेंत व कालेजांत अनेक विषयांचा अभ्यास करावा व तो अभ्यास पुरा झाला कीं, नंतर राजकीय विषयांची चर्चा करण्यास हरकत नाहीं. परंतु त्यापूर्वीं जर राजकीय बाबतींत मुलें व तरूण लोक पडूं लागले तर त्यांचा ज्ञान मिळविण्याचा काळ फुकट जाईल व त्यांचें फार नुकसान

होईल. अभ्यास करून वेळ मिळाला तर राजकीय विषयांवरील पुस्तकें, अगर चांगले लेख किंवा चांगलीं वर्तमानपत्रें वाचण्यास हरकत नाहीं व त्याबद्दल चर्चा करण्यासही हरकत नाहीं; परंतु अभ्यास टाकून या विषयाचें वाचन करण्यांत, अगर हवीतीं वर्तमानपत्रें वाचण्यांत, अगर सर्व प्रकारच्या सभांस जाऊन वेळ घालविणें विद्यार्थ्यांस चांगलें नाहीं. विद्यार्थी असतांना उत्तम विद्यार्थी होण्याचा प्रयत्न करावा. विद्या पुरी झाली कीं गृहस्थाश्रम घेतल्यावर गृहस्थाची व नागरिकांचीं कामें उत्तम प्रकारें करावीं. व नागरीक ह्मणून राजकीय बाबतींचा अवश्य विचार करावा. कोणतीही गोष्ट यथाकाली केली ह्मणजे त्यापासून फलप्राप्ति चांगली होते.

(५) विद्यार्थ्यांनीं लहानपणीं शाळेंत व कालेजांत शिकत असतांना आपला वेळ जर वर्तमानपत्रें वाचण्यांत व राजकीय विषयाची चर्चा करण्यांत किंवा सभा करून व्याख्यानें देण्यांत घालविला तर त्यांचा अभ्यास चांगला होणार नाहीं. व [illegible] त्यांचे विचार परिपक्व झालेले नसतात व त्यांचें अध्ययनही फार थोडें असतें. यामुळें त्यांनीं केलेले चर्चेपासून किंवा लिहिलेले लेखांपासून उपयोग फारच थोडा होईल. परंतु ज्ञान मिळविण्याचा त्यांचा वेळ फुकट गेल्यामुळें त्यांचे व त्यांच्याकरतां खर्च करणारांचे फार नुकसान होईल. "ज्ञानलवदुर्विदग्ध" स्थितींत मोठमोठ्या विषयांवर चर्चा करण्यापासून कोणासच फायदा होत नाहीं. व आमच्या संस्था वाढीस न लागतां कालांतरानें आपोआप लयास जातात, याचें कारण त्या संस्थांत जी भरती होत असते त्यांस खरें समें कळ-

लेलें नसतें. एखादा आधारस्तंभ खचला कीं, त्यावरोबर सर्व इमारत कोसळून पडते.

( ६ ) जिकडे तिकडे राजकीय चळवळी सुरू आहेत, सरकार त्यांचा प्रतिकार करीत आहे, कडक कायदे होत आहेत, लोक त्यांचा निषेध करीत आहेत, विद्यार्थ्यांसंबंधीं सरकारनें सरक्युलरें काढलीं आहेत, कांहीं विद्यार्थ्यांस वाईट रीतीनें वागविल्याचें ऐकिवात येत आहे, त्याबद्दल घरोघरीं बायका मुलांत चर्चा होत आहे, राजकीय चळवळींत पडणाऱ्या माणसांस सरकार नोकरी देण्यास नाखुश असते, सभांमधून पोलीस बसलेले असतात, व्याख्यानें लिहून घेतात, रिपोर्ट करतात, सभा बंद करण्यांत येत आहेत, घरोघर मुलांस पुढें काय उद्योगास लावावी याबद्दल काळजी उत्पन्न झाली आहे, पुर्वीचे बी. ए. झालेले लोक मोठमोठ्या सरकारी नोकऱ्या करीत आहेत, आज मितीस ग्राजुएट लोक पंधरा वीस रुपयाच्या नोकरीस महाग झाले आहेत, लोअर स्टयांडर्ड, हायर स्टयांडर्ड झालेले हुशार ग्राजुएट लोक तीस चाळीस रुपयावर हमालासारखे खपत आहेत, एल्. एल्. बी. झालेले लोक तीस पसतीस रुपयावर नोकऱ्या करीत आहेत, म्यट्रीक्युलेशनचे परीक्षेस सरकारच्या दरबारांत किंमत राहिली नाहीं, कालेजांत चार वर्षे शिकून स्वतंत्र धंदा करण्याची पात्रता येत नाहीं, शाळामास्तर अगर प्रोफेसर, डाक्टर, किंवा वकील होण्याची सामुग्री मिळते, या पलीकडे दुनियेंत उपयोगी पडणारें ज्ञान मिळत नाहीं. यामुळें कालेजांतून आल्यावर सरकारी नोकरीशिवाय दुसरा धंदा करण्यास अडचण पडते. व सरकारची हल्लीं या लोकांवर

गैरमर्जी झाली आहे. ह्या सर्व गोष्टी मुलें वाचतात, ऐकतात, घरोघर चर्चा होते, व त्याबद्दल तीं विचार करूं लागतात.

(७) सरकार व लोक यांच्या दरम्यान सध्यां जे प्रकार चालले आहेत, ते मुलें व विद्यार्थी पाहतात. हल्लींचीं मुलें ज्यास्त चौकस झालीं आहेत. त्यांस आपल्या स्वतः संबंधींच्या गोष्टी समजतात. घरांतील लहान लहान मुलांससुद्धां त्यांच्या संबंधीं ज्या गोष्टी असतात त्या किती समजतात याकडे नीट लक्ष द्यावें ह्मणजे कळून येईल. सरकारनें मुलांसंबंधीं सरक्युलर काढलें हीच मोठी चूक झाली. सरकार कोणत्या बाबतींत हात घालील याचा नेम राहिला नाहीं. मुलांनीं सभेस जावे अगर न जावे याबद्दल बंदोबस्त करण्याचा अधिकार आईबापांचा व पालकांचा आहे. त्यांच्या संमतिशिवाय त्यांच्या हक्कांवर एकदम अतिक्रमण झाल्यामुळें सरकारचा हेतु चांगला असला तरी क्रिया अविचाराची झाली.

(८) हिंदुस्थान देशांत एकसत्तात्मक एकतंत्री राज्य पद्धतीस सरकारचें हें वर्तन अनुसरून आहे. परंतु देशांत लोक सुधारत आहेत; त्यास पालकाचे हक्क काय आहेत; हें समजूं लागलें आहे. सर्व हिंदुस्थान देशांत अल्पवयी मुलें आहेत, त्यांच्या शरीराचें व मिळकतीचें पालन करणार इंग्रज सरकार आहे; या तत्वावर देशांत राज्यपद्धति चालली आहे; हें लोकांस समजूं लागलें आहे. सरकार जें जें करतें तें तें आमच्या हिताकरितां करीत आहे. आह्मी अज्ञान आहोंत तोंपर्यंत आह्मांस अज्ञानाचा कायदाच लाविला पाहिजे व अज्ञानाचा कायदा प्रत्यक्ष ज्या गोष्टीस लागू नाहीं तितकी कृत्यें व तितकें आचरण करण्यास

आह्मांस सरकारनें मोकळीक दिली आहे. आह्मी सज्ञान झालों व कोर्टांतून आह्मी सज्ञान झाल्याबद्दल सरटिफिकिट मिळालें कीं, आह्मास स्वतंत्र रीतीनें वागण्याची, व आमच्या मिळकतीची व्यवस्था करण्याचा अधिकार मिळेल. तोंपर्यंत आमच्या पालकांच्या आज्ञेंत आह्मीं राहिलेंच पाहिजे. अशा प्रकारच्या चर्चा सुरू होण्यास सरकारचें वर्तन कारण आहे.

( ९ ) असल्या बिघडलेल्या वातावरणांत हिंदुस्थानचे लोक राहात आहेत. घरांत जे व्यवहार चालू असतात. त्याप्रमाणें मुलें खेळांत त्या व्यवहाराचें अनुकरण करीत असतात. जें जें पाहातात, ऐकतात, त्याचा नमुना मुलें अगदीं लहान असतांना मुद्धां करून दाखवितात. ज्यास मन आहे, बुद्धि आहे, विचार शक्ति आहे, त्यांचा प्रकार असा व्हावयाचा च. जे प्रकार देशांत चालू आहेत त्याकडे विद्यार्थ्यांचें मन गेल्याशिवाय राहाव-याचें नाहीं. सभेस जाण्याची व व्याख्यानें ऐकण्याची इच्छा त्यास झाल्याशिवाय राहावयाची नाहीं. या कामांत सक्ति केली तर नजर चुकवून मुले सभेस जातील. सभेस जावून व कांहीं लोकांची व्याख्याने ऐकून विद्यार्थी बिघडतील असें ज्यास वा-टत असेल त्यांनीं विद्यार्थ्यास पद्धतशीर राजकीय शिक्षणाचा क्रम सुरूं करावा. व हल्लीं ज्या राजकीय चळवळी चालतात, व जी व्याख्याने होतात, व जे वर्तमानपत्रांत लेख येतात त्यांत काय दोष असतात हें लोकांस व विद्यार्थ्यांस समजून देण्याची सोय करावी. त्या ठिकाणीं राजकीय विषयांचा सशास्त्र उहा-पोह झाला ह्मणजे लोकांस व विद्यार्थ्यांस खरें ज्ञान मिळेल व तें वाईट प्रकारच्या चळवळीत पडणार नाहींत.

( १० ) हल्लीं लोकांचेपुढं एकच बाजू येते. सरकार काय करीत आहे हें उदाहरणे देऊन सिद्ध करून दाखवावे. सभाबंदीचे कायदे करणे व सरक्युलरं काढणे अशाने लोकांची व विद्यार्थ्यांची खरी सुधारणा होणार नाहीं. त्यांच्या मानसीक वृति बदलल्या पाहिजेत. त्या जबरीच्ने उपाय करून पालटणार नाहींत. हल्लींच्या राजकीय चळवळी नुसत्या सरकारास दोष देण्याकरतां आहेत असें सरकार तर्फे ह्मणणे आहे. तोच आक्षेप सरकारावर लोक घालित आहेत. दोन्ही बाजू लोकांपुढे निःपक्षपातानें मांडण्यात आल्या तर त्यापासून फायदा होईल. परंतु तसें न करता सरकारनी कांहीं ग्रंथ तयार करविले आहेत. ते एकतर्फी आहेत असें दिसते. असल्या ग्रंथापासून लोकावर चांगला परिणाम होत नाहीं. ते ग्रंथ ह्मणजे सरकारची बाजू जितकी चांगली दाखविता येईल तितकी चांगली दाखविण्याकरता मुद्दाम लिहिलेले आहेत. असल्या ग्रंथात अतिशयोक्ति फार आहे. इंग्रजसरकारचें मंडण करणारी हीं पुस्तकें आहेत. यांत गर्वोक्तिचा भाग पुष्कळ आहे. व हिंदुस्थानांतील लोक अगदीं कुचकामाच्ने आहेत असें दाखविण्याचा प्रयत्न आहे. इंग्रज सरकारची चांगली बाजू खुलवून दाखविण्याकरता जे ग्रंथ लिहिलेले आहेत ते हिंदुस्थानांत एकसत्तात्मक सार्वभौम राज्यपद्धतीचे अभिमानी लोकांनीं लिहिले आहेत. लार्ड लिटनसाहेब कोणत्या पक्षाचे व मताच्ने होतें हें सांगण्यास नको. कर्झनशाही--लिटनसवायी झाली. हे दोघे दिल्लीचे मुख्य ध्वजस्तंभ होत. सरजान स्ट्राची, लीवारनर, हंटरसाहेब हे मिव्हील सर्वीसमधील रत्ने आहेत. यांनीं जे लेख लिहिले आ-

 १४२

हेत. त्यांत दोन्ही पक्षाचें निःपक्षपाताचें विवेचन दिसत नाहीं. यामुळें त्याचा परिणाम लोकांच्या मनावर चांगलासा होत नाहीं.

( ११ ) इंग्रजलोकांचें राज्य कोणत्या तत्वावर चाललें आहे. ती राज्यपद्धति हिंदुस्थान देशास कशी हितावह झाली आहे. त्या राज्यपद्धतीतील गुण दोष प्रांजलपणें कबूल केले पाहिजेत. व जे दोष दिसत असतील ते एकदम बंद करतां येत नसले तर हळुहळु कमी कसें करण्याचें योजिलें आहे. वगैरे गोष्टी सरकाराकडून लोकांस समजून देण्याकरता चांगली सोय झाली पाहिजे. सरकारची राज्यकारस्थानें गुप्त रीतीनें चालतात. नेटीव लोकांवर विश्वास नाहीं. त्यामुळें लोकांचा विश्वास सरकारवर नाहीं. हल्लीं चालू असलेल्या राजकीय चळवळी मोडून काढण्याचा जो प्रयत्न चालला आहे त्यापेक्षां त्यास चांगलें वळण देण्याचा प्रयत्न करावा. लहान मुलांपासून थोरमाणसापर्यंत त्यांस देशांतील राज्यकारभार खरोखर आपल्या हिताकरितां चालला आहे असें समजलें ह्मणजे गैरसमज जाईल.

( १२ ) आपले आईबाप, भाऊ, बहिणी, काका, पुतणे, इष्टमित्र, लहान अगदींतरूण, हातारे आपले समक्ष मरत आहेत. दुष्काळ पडत आहे. माहागाईमुळें खाण्यास मिळत नाहीं, या गोष्टी शाळेंतील जाणत्या विद्यार्थ्यांस व कालेजातील विद्यार्थ्यांस समजत नाहींत काय? या गोष्टीशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध येत नाहीं काय? या गोष्टी समजण्यास सभा नकोत. या गोष्टी लोकांसमोर घडत आहेत. प्लेगमध्यें बाहेर जाऊन राहावें लागतें जवळ पैसा नसतो ह्मणून लवकर बाहेर जाता येत नाहीं. थंडीवाऱ्यांत राहण्याइतकी ऐपत नसते, हाल होतात. मुले अजारी

पडतात, कामधंदा करण्यास फार अडचण पडते, फार त्रास व दगदग होते, मुलांस शाळेंत लांबून जावें लागतें, शाळा व कालेजे बंद करावी लागतात, मुलांचा विद्याभ्यास मागें पडतो, मुलांच्या विद्येचे नुकसान होते, ह्या गोष्टी मुलांस व विद्यार्थ्यांस कळण्यास कठीण आहेत काय? व ह्या समजून देण्यास व्याख्यानांची जरूर आहे काय? या बाबतींत सरकार कसें वागते, हें विद्यार्थ्यांस समजत नाहीं काय?

( १३ ) शिकलेल्या लोकास सरकारी नोकरींत त्यांची काय दशा होत चालली आहे हें विद्यार्थ्यांस व कालेजातील लोकास दिसत नाहीं काय? लाला लजपतराय यास चौकशी केल्या शिवाय हद्दपार केले हें न्यायाच्या विरूद्ध झालें हें विद्यार्थ्यांस समजत नाहीं काय? कानफरन्स,कांग्रेस, सोशलकानफरन्स, इंडस्ट्रिअल कानफरन्स, टेंपरन्स असोसियेशन प्रदर्शन वगैरे देखावे विद्यार्थी पाहात नाहींत काय? व त्याबद्दल हकीकती ते वाचणार नाहींत काय? टाइम्स ऑफ इंडियासारखी वर्तमानपत्रे व केसरी-सारखी वर्तमानपत्रें ते वाचतात. दोघांचे लिहिण्यांत मोठा फरक पडला तर त्याबद्दल त्यांनां कोण खरा कोण खोटा असें जाणण्याची जिज्ञासा होणार नाहीं काय? ते आपसांत चर्चा करतील. व एकमेकांची मतें एकमेकाशीं तुलना करतील. त्यास अभ्यास फार असला तरी सुटीचे दिवसांत, व फावलेवेळांत, फिरावयास जाताना, जेवताना जेव्हां जेव्हां त्यास सवड मिळेल त्यावेळेस ते प्रचालित विषयाबद्दल विचार केल्याशिवाय कसे राहातील. त्याना दुनियेंत काय चाललें आहे याचा पत्ता लागू नये ह्मणून

जानसनच्या रासेलस सारखी व्यवथा केली तर विद्यार्थ्यांस ह्या बाबतींत विचार करण्याचें बंद करिता येईल.

( १४ ) ज्या ज्या वेळीं जे जे विषय लोकांसमोर असतात त्या बद्दल विचारी पोक्त लोकांचे ह्मणणे काय आहे. हें विद्यार्थ्यांस समजून द्यावे. शाळेंत हेडमास्तरकडे हें काम सोपवावें. त्यानें कोणत्याही एका पक्षाचा आभिमान न धरता निःपक्षपाताने मुलास त्या विषयातील तत्वें समजून द्यावी. व विद्यार्थ्यांचीं मने भलत्याच मार्गानें जाणार नाहीत अशी काळजी घ्यावी. शाळेचे हेडमास्तर चांगल्या स्वभावाचे, मन मिळाऊ, धोरणी, विद्वान, शाहाणे, व निःपक्षपाति, शांतवृत्तीचे असले ह्मणजे ते विद्यार्थ्यांस आवडतात. त्यांची छाप विद्यार्थ्यांवर राहाते. त्यांचें बोलणे विद्यार्थी ऐकतात. अशा शिक्षकांची गावांत लोकांची जास्त ओळख झाली तर लोकांस ते प्रिय होतील व मुलांच्या पालकांचा त्यांच्यावर विश्वास बसेल. आणि शिक्षक व पालक यांनीं दोघांनीं मनावर घेतल्यास मुलें व्याख्याने ऐकून अगर सभास जाऊन बिघडणार नाहींत व जाहीर व्याख्यानास शिक्षकांस जाण्यास उघड परवानगी असावी, किंवा त्यांनीं मुद्दाम जावे व नंतर त्यातील बऱ्या वाईट गोष्टी विद्यार्थ्यास समजून द्याव्या अशी व्यवस्था केली तर सभास जाण्यापासून व व्याख्याने ऐकल्यापासून मुलांवर व विद्यार्थ्यांवर वाईट परिणाम होणार नाहीत. राजकीय विषयांच्या मुलास व विद्यार्थ्यास व कालेजांतील मुलांस विटाळ होऊ द्यावयाचा नाहीं अशी व्यवस्था करणे शक्य नाहीं. एकदा विद्यार्थ्यांस त्या विषयासंबंधी बरोबर माहिती मिळाली व योग्य तत्वें

कळलें ह्मणजे त्या विषयावर त्यांनीं कितीही व्याख्याने ऐकिली तरी त्याचा वाईट परिणाम व्हावयाचा नाहीं.

(१५) मीठ आपोआप उत्पन्न होतें. तें कोणी भरून नेल्यास त्यास शिक्षा होते. जनावराकरतां झाडाचा पाला लोकांनीं नेला तर त्यास शिक्षा होते. झाडाची साल अगर फांदी तोडल्यास क्षुल्लक बाबतीवरून शिक्षा होते. जंगलांतील लांकडें तोडण्यावर सक्त मनाई आहे. सरपण अतिशय महाग होत आहे. गोवऱ्यावर सरपणाचें काम भागवावें लागतें. घरांत धूर, बायकांस अतिशय त्रास होतो त्यांचे डोळे बिघडतात. घरांत दुधदुभतें कमी होत चालले. गायी ह्मशी ठेवण्यास जड जाऊं लागले. तुप खाण्यास पंचाईत पडली. तेल अतिशय महाग झाले लोकांस हे पदार्थ खाण्यास मिळेनासे झाले. गावांत दारूचीं दुकानें पुष्कळ वाढलीं. पोलीसचा अंमल फार दिसूं लागला. दुष्काळांत गाई, ह्मशी, बैल, घोडे मेले. त्यांची किंमत फार वाढली. घरोघरीं गाई ह्मशी पूर्वी होत्या. हल्लीं दिसत नाहींत. गरीब लोकांच्या मुलांस सुद्धां दुध पिण्यास मिळत असे तसें हल्लीं मिळत नाहीं. थोड्या पगाराच्या कुटुंबवत्सल लोकांस निर्वाह होण्याची मारामार पडते. दाराशीं भीक मागण्यास लोक जास्त येतात. शाळेंत व कालेजांत मिळणाऱ्या शिक्षणाचा उपयोग नाहीं. दुसरा धंदा नाहीं. जवळ जमीन नाहीं. व्यापार करण्यास भांडवल नाहीं. ह्या गोष्टी विद्यार्थ्यांस कळत नाहींत काय? जर कळतात तर त्याबद्दल ते चर्चा करणार नाहींत काय? अशी स्थिति होण्याचीं कारणें त्यांस कोणी सांगितलीं तर ते ऐकणार नाहींत काय? अभ्यास करीत असतांनासुद्धां या गोष्टी

समजून घेण्याची इच्छा त्यास होईल. व यांस कारण सरकारची राज्यपद्धति, देशांतील सर्व व्यापार, दुसऱ्या लोकांच्या हातांत आहे; आपण केवळ परावलंबी दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिणारे लोक आहोत. कांहीं गोष्टींत आपल्यास सरकारच्या मदतीशिवाय सुधारणा करतां येईल, असें त्यास कोणी समजून दिलें व त्याप्रमाणें त्यास वाटूं लागलें तर त्यांचें वर्तन त्या धोरणावर जाणार नाहीं काय? हल्लीं चालू असलेल्याप्रकाराबद्दल विद्यार्थ्यांनीं विचार करूं नये व त्यांनीं अगदीं तटस्थ राहावें. आपलें वर्तन बदलूं नये, असें ह्मणणें ह्मणजे मनुष्य स्वभावाविरुद्ध करण्यास सांगणें आहे.

( १६ ) प्लेगच्या रोगानें बरोबरीचे हांतकरू तरूण विद्यार्थी मेले. त्यांच्या अगदीं अल्पवयी विधवा मागें आहेत. शाळा व कॉलिजें बंद होतात. आई बाप गांव सोडून दरसाल गांवाबाहेर जाऊन कष्ट काढीत असतात. मुलांच्या विद्येस पैसा वाटणीस येत नाहीं, विद्या करण्यास पैसा जास्त लागतो. कित्येक मुलांस शाळा व कॉलिजें सोडून देऊन मिळेल ती नोकरी धरावी लागते. या गोष्टी विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष अनुभवास येत आहेत. त्यांचे चित्त अस्वस्थ होणार नाहीं काय? विद्या करण्यास चित्ताची स्वस्थता लागते, मुलगा कालेजांत असतो. घरचीं माणसें प्लेगमुळें बाहेर असतात. कोणी अजारी पडतो. विद्यार्थ्यांस काळजी लागते. अशी स्थिति दरवर्षी निदान तिनचार महिने राहाते. सभोंवती सर्व बाजूस अस्वस्थतता चालू असतां विद्यार्थ्यांनीं स्वस्थ चित्तानें अभ्यास करणें शक्य नाहीं.

( १७ ) तथापि त्यांनी मनाचा आवर करावा. एकैक गोष्ट एकावेळीं करावी. लहान वयांत जितकी विद्या संपादन करितां येईल तितकी करावी. आपल्यापेक्षां वडील माणसें देशाची सुधारणा करण्याकारितां खटपट करीत आहेत. आपला विद्याभ्यास होईपर्यंत आपण शांतपणा धरला पाहिजे. शाळेच्या व कालेजाच्या नियमाप्रमाणे वागलें पाहिजे. आपण पुष्कळ विद्या केली व पुष्कळ ज्ञान संपादन केलें तरच आपला पुढें देशास जास्त उपयोग होईल. विद्यार्थी असतांना आपली जी मतें असतील ती जास्त ज्ञान झालें तर बदलावी लागतील. व आपण वेडे ठरूं या करितां घाई करूं नये. कोणत्याही गोष्टीचा शांतपणे विचार करावा आणि "सहसा विदधीत न क्रियाम्" हें तत्व लक्ष्यांत ठेवावें. विद्यार्थ्यांनीं शिक्षकाच्या व त्यांच्या प्रोफेसरच्या सल्यानें राहिल्यास एकमेकांचा बेबनाव होणार नाहीं. गुरु व शिष्य यांचे दरम्यान प्रेम व एकी असणे जरूर आहे विद्या करण्याचा काळ हें एक व्रत आहे, तें तप आहे; त्यावेळीं अनेक गोष्टी वर्ज कराव्या लागतात. आपल्या विद्येस व्यत्यय येईल व गुरु शिष्यांत बिघाड होईल असें वर्तन वर्ज्य करावें. हायस्कूलांत व कालेजांत इतिहास, अर्थशास्त्र व दुसरे पुष्कळ अनेक विषयांचें ज्ञान करून घेतलें तर पुढें राजकीय, सामाजिक, सांपत्तिक वगैरे अनेक विषयांचा सशास्त्र विचार करण्याची शक्ति येईल. विद्या करून स्वतंत्र विचार करण्याची शक्ति आली पाहिजे. जोंपर्यंत आपण विद्यार्थ्यांचा धंदा करीत आहोंत तोंपर्यंत तोच धंदा जितका चांगला करता येईल तितका करावा. आपल्या ज्ञानाचा पाया भक्कम करावा. आईबाप अगर पालक ज्या कामाकरितां

आपल्यासाठीं पैसा खर्च करीत असतात तें काम उत्तम रीतीनें करावें. काळ पालटत असतो, स्थिति पालटत असते. विद्या मिळविण्याची संधी फुकट दवडली तर तें नुकसान पुढें भरून येणार नाहीं.

( १८ ) युनिव्हरसिटिबिलासारख्या कायद्याची चर्चा चालली असतां कालेजांतील विद्यार्थी त्यांत मन घालणार नाहींत काय? व असें करणें चुकीचें होईल काय? या करितां ज्या सभा होतील त्या राजकीय विषयाबद्दल सभा नाहींत असें ह्मणता येईल काय? विद्यार्थ्यांनीं या सभास जाऊं नये अगर या संबंधीं आपली मतें देऊं नये व या चळवळींत त्यांनीं पडूं नये असें जर विद्यार्थ्यांस सांगितलें तर तें कितपत शाहाणपणाचें होईल. सर्वच विद्यार्थी सारखे नसतात. परीक्षेचा सर्व अभ्यास करून त्या शिवाय जास्त वाचणारे विद्यार्थी असतात. कालेजांत लायब्ररी असते. तेथें वर्तमानपत्रें घेतात. मासीक पुस्तकें असतात. तीं सर्व विद्यार्थी वाचतात. तीं वाचण्याकरतांच घेतलीं असतात. मग हीं वर्तमानपत्रें व इतर पुस्तकें त्यांनीं वाचलीं तर त्याबद्दल ते चर्चा करतील हें उघड आहे. व ज्यांना चांगलें बोलतां येतें ते स्वतः व्याख्यान देतील व ज्यांना चांगलें लिहितां येतें ते स्वतः वर्तमानपत्रांत अगर इतर रीतीनें आपले विचार प्रसिद्ध करतील.

( १९ ) सर्व विद्यार्थ्यांस एक नियम लागू करतां येणार नाहीं. कालेजांतील व शाळेंतील अभ्यास मागें टाकून विद्यार्थ्यांनीं राजकीय विषयाचा अभ्यास करूं नये किंवा राजकीयचळवळी करण्यांत आपला वेळ व बुद्धि खर्च करूं नये हें सांगणें बरोबर

होईल. परंतु कोणाही विद्यार्थ्यानें राजकीय चळवळींत पडूं नये हें सांगणें बरोबर होणार नाहीं. राजकीय चळवळ करणें हा कांहीं अपराध नाहीं. अनीतीचें नाहीं. किंवा यांत अधर्म नाहीं. हा प्रश्न लायकीचा आहे. सर्वच राजकीय प्रश्न मोठे बिकट आहेत असेंही नाहीं. कांहीं प्रश्न कालेजांतील विद्यार्थ्यांस व हायस्कूलांतील जाणत्या विद्यार्थ्यांस समजण्यासारखे आहेत. कांहीं अंशीं विद्यार्थ्यांस हे विषय समजतात ह्मणूनच ते या गोष्टींचा विचार करतात व त्यांत पडण्याची त्यांस इच्छा होते. कालेजांतील प्रोफेसर व विद्यार्थी यांनीं एके ठिकाणीं जमावें. सुटीचे दिवसांत याबद्दल चर्चा करावी व दोन्ही बाजूचा निःपक्षपातानें विचार करण्याच्या सवयी विद्यार्थ्यांस लावावी. मध्यम बुद्धीचे ह्मणजे ज्यांस, हायस्कूलांतील व कालेजांतील अभ्यास उरकण्याची मारामार पडते त्यांनीं तोच अभ्यास करावा. दुसरीकडे लक्ष्य देऊं नये.

( २० ) हल्लीं कालेजांत मुलांस ठेवणें फार खर्चाचें झालें आहे. दर विद्यार्थ्यांस दरमहा तीस चाळीस रुपयेपर्यंत कालेजच्या शिक्षणाकरतां खर्च करावा लागतो. ज्यांना भावंडें आहेत त्यांचा शिक्षणक्रम हायस्कूलांत चालू असतो. त्याकरतांही खर्च होत असतो. व एकावेळीं दोन मुलें किंवा तीन मुलें कालेजांत जाण्यास तयार झालीं तर त्यांच्या शिक्षणास पैसा पुरा पडावयाचा नाहीं. सर्वांत चांगला मुलगा असेल त्यास कालेजांत ठेवून बाकीच्या मुलांस बिनखर्चाच्या उद्योगांत घालावें लागेल. पुष्कळ लोक स्वतः अडचण सोसून कुटुंबास लागणारा जरूर तो खर्चसुद्धां कमी करून मुलें कालेजांत पाठवितात.

हल्लीं सर्व जिन्नस महाग झालें आहेत. कुटुंबाच्या निर्वाहास पूर्वीपेक्षां खर्च जास्त लागतो. याकरितां कालेजांत गेल्यावर परिक्षेचा अभ्यास उत्तम प्रकारें करणें हें पहिलें काम आहे. विनाकारण भलत्याच विषयाची चर्चा करीत बसणें चांगलें नाहीं. व आपला परीक्षेचा अभ्यास पूर्ण होईपर्यंत ह्मणजे परीक्षा पास होण्याची खातरी आल्याशिवाय परीक्षेचा अभ्यास टाकून राजकीय बाबतींत मन घालण्याचा कोणत्याही विद्यार्थ्यास अधिकार नाहीं. आपलें मुख्य कर्तव्य टाकून दुसऱ्या कामांत आपली मानसिक शक्ति खर्च करणें हा एक दुर्गुण आहे. हें गैर वर्तन आहे. परीक्षा पास झाली नाहीं तर पालकांस पांचशें रुपये दरसाल दंड भरावा लागतो. पैशाचें नुकसान होतें. पालकांस वाईट वाटतें. व कधीं कधीं मुलें वाईट आहेत, त्यांच्या करतां खर्च करण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें पालकांस वाटून मुलांच्या वरील प्रेम कमी होण्याचा संभव आहे. यांत मुलांचें फार नुकसान आहे.

( २१ ) ज्या लोकांनीं राजकीय विषयाचा अभ्यास केला आहे व ज्यांनीं त्याबद्दल विचार केला आहे ते लोक आपले विचार जगापुढें मांडतात. कित्येक लोक ग्रंथ लिहितात. व आपल्या मताचें समर्थन साधकबाधक कारणें देऊन करतात. ते त्यांचे ग्रंथ सावकाशपणें वाचतां येतात. व त्याबद्दल आपणास विचार करण्यास सवड मिळते. कित्येक लोक व्याख्यानें देतात. व्याख्यानाचा वेळ थोडा असतो, विषय मोठाले असतात, ह्मणून थोड्यावेळांत पुष्कळ गोष्टी सांगणें जरूर असते. ज्यांनीं खोल विचार केलेला असतो. ज्यांना विचारसरणी चांगली जुळवितां येते त्यांनाच थोड्या वेळांत

पुष्कळ गोष्टी चांगल्या रीतीनें लोकांपुढें ठेवितां येतात. मनांत आलेले विचार स्पष्टकरून दाखविण्याइतकें भाषेचें पूर्ण ज्ञान असते. त्यांनाच भाषण चांगलें करतां येते. परंतु पुष्कळ गोष्टी थोडक्यांत सांगितल्यानें ज्यांनीं त्या विषयावर पूर्वीं विचार केला नसतो त्यांस थोड्या वेळांत त्या विषयाची समजूत होत नाहीं. यामुळें बऱ्याच लोकांस सभेंतील व्याख्याने ऐकून उपयोग होत नाहीं. वर्तमानपत्रांत जे लेख येत असतात ते बहुतेक टिकात्मक असतात. ती टीका समजण्यास हीं ज्या विषयासंबंधीं चर्चा चालू असते तो विषय पूर्वीं अवगत असला पाहिजे. एकेक विषय घेऊन त्या विषयावर पूर्ण विवेचन वर्तमानपत्रांत करण्यास सवड नसते. शिवाय प्रत्येक विषयावर मतभेद झाला ह्मणजे खरी बाजू कोणती खोटी बाजू कोणती हें समजणें जरूर होतें. सर्वांशीं खरी, किंवा सर्वांशीं खोटी अशी कोणती बाजू पुढें येत नाहीं. नेहमीं या दोहोंचें मिश्रण जगापुढें येत असते. त्यांतून तथ्य निवडावयाचें असतें. हल्लीं राजकीय बाबतींत अनेक पंथ झाले आहेत. एक सरकारचा पक्ष. दुसरा प्रजापक्ष. त्यांत मवाळ व जहाल असे दोन पक्ष. कांहीं अर्धे मवाळ व काहीं अर्धे जहाल आहेत. व कांहींचीं मतें काय आहेत हेंच समजणें कठीण आहे. ह्या सर्व प्रकारचे व पंथाचे लोक व्याख्याने देतात, वर्तमानपत्रांत लिहितात व राजकीय चळवळी करितात. राजकीय चळवळी प्रजा ह्मणजे लोकच करतात असें नाहीं. सरकारचे तर्फें त्यांचें इंग्रज कामगार व इंग्रजींत वर्तमानपत्रें चालविणारे वर्तमानपत्रकर्ते, व इतर इंग्रज लोक, व पोलीस व सरकारी नोकर हे राजकीय चळवळी करीत असतात अशा स्थितींत

क्र.
२१

कोणती वाजू किती ग्राह्य, कोणती किती त्याज्य, हें त्या विषयां-चें ज्ञान असल्याशिवाय ठरवितां येणार नाहीं.

( २२ ) सरकारच्या राज्यपद्धतीसंबंधीं चर्चा करतानां हलकट किंवा असभ्य भाषा वापरूं नये. कोणत्याही विषयाचा शांतपणें विचार करण्याची सवय लावावी. कोणत्याही विषयवार लिहितांना किंवा बोलतांना भाषा चांगली वापरावी. जें मत आपल्यास सिद्ध करावयाचें असेल त्याबद्दल कारणें व पुरावा मजबूत असावा. त्यास आधार असावे. विचारसरणी चांगली असावी. भाषण व लिहिणें तें थोडें असलें तरी हरकत नाहीं परंतु तें मुद्देसूद असावें. राजकीय चळवळींत येण्यास थोडा उशीर लागला तरी हरकत नाहीं. पण चांगली सामुग्री करून त्या कामास योग्य व लायक होऊन नंतर तें काम उत्तम रीतीनें करावें ह्मणजे लोकांस व सरकारास खरा फायदा होईल. पुष्कळ वाचणें, पुष्कळ बोलणें, पुष्कळ लिहिणें,व पुष्कळ चळवळ करणें यापासून फारसा फायदा होत नाहीं. जसें खाल्लेलें अन्न आंगीं लागलें तर शरीरास पुष्टी येते त्याचप्रमाणें जें वाचलें तें समजलें पाहिजे, त्याचा विचार केला पाहिजे.

( २३ ) आपली स्थिति काय आहे. आपणास कोणता उद्योग करतां येईल व कोणता धंदा करण्याची जास्त अनुकूलता आहे हें ध्यानांत ठेवावें. आयुष्यांत धंदा वारंवार बदलतां येत नाहीं. ज्या धंद्याची पूर्वीपासून चांगली तयारी झालेली असते तो धंदा चांगला करता येतो. त्यांत यश येते. आपलें आयुष्य कोणत्या उद्योगांत अगर धंद्यांत घालावयाचें हें आपल्यास ठरवितां येत नाहीं. तशा प्रकारची आपल्या देशांत

अद्याप सोय झालेली नाहीं. निरनिराळ्या धंद्याचें व उद्योगाचें शिक्षण देण्याची सोय नाहीं. कोणत्या धंद्यास कोणता मुलगा योग्य आहे हें समजून घेऊन त्या धोरणावर अद्याप शिक्षण मिळत नाहीं. लोकांची स्थिति गरीबीची आहे. आपले आईबाप व पालक आपल्या विद्येकरितां जो पैसा खर्च करतील त्याचें चीज करावें. मुलांच्या विद्येकरतां खर्च करून तो फुकट गेला ह्मणजे कुटुंबाचें फार नुकसान होतें. दुसरे उद्योग करण्यास ऐपत असेल व योग्यता असेल तर तो उद्योग करवा. द्रव्याची अनुकुलता असेल तर व्यापार करावा. शेती घरची असेल तर शेती करावी. एखादा कारखाना काढण्याची शक्ति असेल तर कारखाना काढावा. श्रीमंत लोकांनीं आपल्या मुलांस द्रव्य देऊन अनेक इसमानीं एके ठिकाणीं होऊन लहान लहान वस्तु तयार करण्याचे कारखाने काढावे. ज्यास हस्त कौशल्याची कामें करता येतील अगर इतर हुन्नर करतां येईल त्यानीं तो करावा. कोणता ही उद्योग धंदा करण्यास लाजूं नये. परंतु जो धंदा करावयाचा त्यांत आपल्या योग्यतेप्रमाणें व मेहनतीप्रमाणें व बुद्धीच्या व्ययाप्रमाणें द्रव्य प्राप्ती झाली पाहिजे. ज्यास वर लिहिलेली अनुकूलता नाहीं, विद्या आहे, बुद्धी आहे, परंतु गरीबी आहे व दुसरा धंदा करण्याची आवड नाहीं त्याला सरकारी नोकरी हा पूर्वापार धंदा आहे. त्यांत सर्वच लोक जाऊं लागले तर लोकांची किंमत राहात नाहीं. परंतु हा धंदा ह्मणून वर्ज करण्याचें कारण नाहीं. व तो धंदा करीत असतां चांगल्या प्रकारें इमानें इतबारें करावा.

( २४ ) पुष्कळ लोकांची स्थिति एकदम पालटते. विशेषें-करून सरकार नोकरांची अशी स्थिति फार होते. देशांत उद्योग धंदा वाढून लोकांस उपजीविकेची साधनें वाटेपर्यंत आहेत तीं कमी करून घेऊं नये. आपण सरकारची नोकरी केली नाहीं तर सरकारचें आडून राहील अशी समजूत कांहीं लोकांची आहे. परंतु जोंपर्यंत देशांत सर्व लोकांस इतर धंदे करून पोट भरण्याची सोय झाली नाहीं तोंपर्यंत असल्या समजुतीपासून नुकसान मात्र होईल. सरकारची नोकरी करण्यांत प्रत्यक्ष आपला फायदा आहे, व सरकारचे अंमलदार चांगलें असणें किंवा वाईट असणें हें आपल्या वर्तनावर अवलंबून आहे. आपण नोकरी धरली व काम चांगल्या रीतीनें सचोटीनें केलें तर राजास व प्रजेस दोघांसही चांगला अंमलदार मिळेल. चांगले लोक नोकरीच्या धंद्यांत पडले नाहींत तर लोकांचें नुकसान होईल. लोकांस मोठमोठ्या नोकऱ्या मिळवावयाच्या त्या सरकारच्या फायद्याकारितां नसून लोकांच्या फायद्याकरतां आहेत.

( २५ ) सरकार आलीकडे नेटीवास मोठमोठ्या हुद्यांच्या जागा देत आहे. दिस्ट्रीक्ट जज्ज, कलेक्टर, हायकोर्टाचे जज्ज, प्रोफेसर वगैरे मोठ्या महत्वाच्या जागा नेटीवास मिळणें जरूर आहे. ह्या जागा मिळण्यास मोठी विद्वत्ता व शहाणपणा व ज्ञान संपादन करावें लागतें. प्रथमपासून जे मोठी विद्या संपादन करतात, पुष्कळ अभ्यास करतात, विचार करतात, परीक्षेत पहिल्या प्रतीस लागतात, वेळ फुकट घालवीत नाहींत, व ज्ञान मिळविण्याकरतां कितीहि श्रम पडले तरी त्याची पर्वा करीत नाहींत तेच लोक मोठमोठ्या जागेस योग्य होतात. ज्या माणसास स्वतंत्र धंदा

करून निर्वाह करता येईल त्यानें तो टाकून सरकार नोकरीत जाणें बरोबर नाहीं परंतु जोपर्यंत असले स्वतंत्र धंदे नाहींत. तोंपर्यंत सरकारी नोकरी वर्ज करावी असें ह्मणणें चुकीचें आहे. विद्यार्थ्यांनीं आपली विद्या पुरी होईपर्यंत ह्या प्रश्नाचा निकाल करणें शहाणपणाचें होणार नाहीं. हा प्रश्न ज्याच्या त्याच्या लायकीचा व स्थितीचा आहे. ज्या लोकांनीं हिंदुस्थान देशांत राष्ट्राची कल्पना निर्माण केली आहे. व लोकांस राष्ट्रभक्त करण्याचा प्रयत्न करीत आहेत, व प्रत्येक गोष्टींत राष्ट्रीयत्व जागृत करीत आहेत, व राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना ज्यांनीं काढली आहे, त्यांनीं आपल्या आंगावर फार मोठी जबाबदारी घेतली आहे. या कामास द्रव्य विपुल पाहिजे. माणसे फार शाहाणी, विद्वान व मेहनती पाहिजेत. व हें शिक्षण देताना विद्यार्थ्यास उत्तम प्रकारचें वळण लाविलें पाहिजे. नाहींतर प्रत्येक गोष्टीस सरकारास दोष देणें यांतच त्यास भूषण वाटूं लागेल. राष्ट्र बनण्यास किती गुण आंगीं यावे लागतात, त्याकरतां किती विद्या संपादन करावी लागते, त्याकरतां किति मेहनत करावी लागते, किति शरीरशुद्धि, चित्तशुद्धि ठेवावी लागते किति आत्मसंयमन करावें लागते, प्रत्येक गोष्टींत व्यवस्थित व पद्धतशीर वागण्याची सवय करवी लागते कोणत्याही गोष्टींत अत्याचार न करणें.

( २६ ) बंगाल प्रांतांत ज्याठिकाणीं पोलीसांनीं लुटालूट केली असें ऐकिवांत येतें, व ज्याठिकाणीं मुसलमान लोकांनीं हिंदु लोकांच्या बायका भ्रष्ट करण्याचा प्रयत्न केला, त्या ठिकाणीं तर बायका रात्रीस तळ्यांत लपून राहिल्या, ह्या गोष्टींचा सरकाराकडून त्यावेळीं योग्य बंदोबस्त झाला नाहीं. कांहीं वकील

लोकांस विनाकारण कैदेंत ठेविलें, व गांवांत जिकडे तिकडे लष्करी शिपायांचा अंमल सुरू झाला, अशी ज्या ठिकाणीं बेबंदशाहीचीं चिन्हें दिसूं लागलीं. त्या ठिकाणीं जाणत्या विद्यार्थ्यांनीं व कालेजांतील विद्यार्थ्यांनीं या बाबतींत पडूं नये असें सांगणें कोणास रुचणार नाहीं; अशावेळीं विद्यार्थी ह्या चळवळी करीत नाहींत, त्यांच्या दृष्टीस जे देखावे पडतात, त्यांच्या कुटुंबावर, त्यांचे मित्र, त्यांचे जात बांधव, त्यांचे देशबांधव यांच्यावर जे प्रसंग येतात, ते प्रत्यक्ष पाहून विद्यार्थ्यांचीं मनें अस्वस्थ होतात व त्याचा प्रतिकार करण्याची इच्छा त्यास झ ल्यावांचून रहाणार नाहीं. माणसांस राग येण्यासारख्या गोष्टी, त्यांस त्वेष चढण्यासारख्या गोष्टी त्यांच्यासमोर घडूं लागल्या, त्या गोष्टींशीं त्यांचा प्रत्यक्ष संबंध येऊं लागला तर त्या गोष्टीवरून त्यानें रागाऊं नये व आपल्या मनास वाईट वाटूं देऊं नये असें सांगणें वेडेपणाचें होईल. विद्यार्थ्यांनीं ह्मणजे जाणत्या विद्यार्थ्यांनीं—कालेजांतील विद्यार्थ्यांनीं—असल्या गोष्टींचा विचार करूं नये व त्यांत पडूं नये अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनीं सर्व विद्यार्थ्यांवर कांहीं तरी जादूचा प्रयोग करण्याची युक्ति शोधून काढावी धमक्या देऊन किंवा सरक्युलरें काढून किंवा नवीन कायदे करून या गोष्टी बंद होत नसतात. जो अन्याय व जो जुलूम लोकांपुढें घडत आहे तो दूर केला कीं, त्यामुळें उत्पन्न झालेल्या मनोवृत्ति आपोआप नाहींशा होतील.

( २७ ) हायस्कुलांतील वरच्या यत्तेतील विद्यार्थी सोळापासून आठरा एकोणीस वर्षांपर्यंत असतात. सातव्या यत्तेतील बहुतेक मुलांचीं लग्नें झालेलीं असतात. कालेजांतील

बरेच विद्यार्थी एक दोन मुलांचे बापसुद्धां झालेले असतात, अशा विद्यार्थ्यांची गणना मुलांमध्यें करतां यावयाची नाहीं. सोळा वर्षांपासून पंचवीस वर्षांपर्यंत हे विद्यार्थी असतात. ह्या वयांत माणसाच्या आंगांत स्वाभाविक धमक जास्त असते. दुनियेचा अनुभव कमी असतो. आपल्यास वाटेल ती गोष्ट करतां येईल असा समज असतो. शरीरप्रकृति निरोगी व बळकट असली तर माणूस या वयांत मेहनतीची व कष्टाची पर्वा करींत नाहीं. मानसिक वृत्ति यावेळीं प्रबळ असून विचार परिपक्व झालेले नसतात. कोणतींही मतें ठाम होण्याइतका जगाचा व व्यवहाराचा अनुभव नसतो. सर्व बाबतींत शिकण्याची क्रिया चालू असते. आंगीं विद्वत्ता येते परंतु विद्येचा उपयोग कसा करून घ्यावा, हें चांगलें समजत नसतें. पैशाची पर्वा वाटत नाहीं, मान अपमानाबद्दल कल्पना मोठ्या असतात. स्वतंत्र रीतीनें वागण्याची इच्छा होते. मत स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य व आचार स्वातंत्र्य अमलांत आणण्याचा प्रयत्न यावेळीं सुरू होतो. कांहीं गोष्टी होण्यासारख्या वाटतात पण त्या होत नाहींत असें अनुभवी माणसांनीं सांगितल्यास यावेळीं रुचत नाहीं, सर्व बेत व कार्यक्रम तर्कशास्त्राच्या सरळ विचारसरणीवर सुरू होतो. कोणतीच गोष्ट असाध्य वाटत नाहीं. शारिरीक व मानसीक शक्तींचे जोर असल्यामुळें उलटपक्षाचें बल कितीही असलें तरी त्याची पर्वा वाटत नाहीं. फार वेळ विचार करण्याइतकी शांती आलेली नसते. अशावेळीं आपला देश भिकारी होत चालला आहे, सरकारनें आपल्यावर जब्र कर बसविले आहेत,

लोकांपासून सरकार वाटेल तितका पैसा कराच्यारूपानें घेतें व आपलें उत्पन्न वाढवितें, तरी लोकांच्या शिक्षणाकरितां फारच थोडी रक्कम खर्च करतें, यामुळें लोकांस चांगलें शिक्षण मिळत नाहीं. लोकांस चांगलें शिक्षण देणें, तें स्वस्त पडेल अशी व्यवस्था करणें, हें सरकारचें काम असतां त्या ऐवजीं शिक्षणास खर्च वाढविणें, शाळेची फी वाढविणें, कालेजाची फी वाढविणें, हें बरोबर नाहीं. ह्या गोष्टी कालेजांतील विद्यार्थ्यांस समजत नाहींत काय? शाळेंत व कालेजांत इतिहास शिकविला जातो. त्याबद्दल चर्चा होत आहे. तो विषय शिकवूं नये, अशाबद्दल ऐकीवांत येत आहे. शाळेंत शिक्षणक्रमाच्या पुस्तकांत जे धडे आहेत किंवा विषय आहेत त्यांत फेरफार होत असतो. हा शिक्षण क्रम चांगला नाहीं. हें कालेजातील व जाणत्या विद्यार्थ्यांस समजत नाहीं काय ? व या गोष्टींशीं सरकारचा संबंध नाहीं काय ?

( २८ ) कालेजच्या विद्यार्थ्यांस पदवी देण्याकरितां मोठा समारंभ करावा व त्या ठिकाणीं सर्व प्रकारच्या विद्वान लोकांस बोलावून आणून त्यांचा धर्म, त्यांची नीति, त्यांच्या चाली रीति व त्यांचें वर्तन, यावर टिकाकरून त्यांची निंदा करावी व ज्यावेळीं विद्वान लोकांचा गौरव करावयाचा, त्यांचा मान ठेवावयाचा त्यावेळीं त्यांचा अपमान करून त्यांस व त्यांच्या पूर्वजांस मूर्ख ठरविण्याचा प्रयत्न करावा, ह्या गोष्टी कालेजांतील विद्यार्थ्यांस व हायस्कूलांतील साहावे व सातवे इयत्तेतील विद्यार्थ्यांस समजण्यासारख्या नाहींत काय ? या गोष्टशीं विद्यार्थ्यांचा संबंध नाहीं काय ? या गोष्टीबद्दल विद्यार्थ्यांस

वाईट वाटणार नाहीं काय ? व ते या विषयाबद्दल विचार करूं लागले व त्याचा प्रतिकार करण्याची इच्छा त्यांस झाली तर त्याबद्दल दोष कोणाकडे ?

(२९) शिक्षण कोणत्या प्रकारचें असावें, हल्लीं चालू असलेले शिक्षण कोणत्या पद्धतीवर देण्यांत येत आहे, त्यांत दोष कोणकोणते आहेत, हल्लीचें स्थितीस तें योग्य आहेत किंवा नाहींत, त्याचे बरेवाईट परिणाम विद्यार्थ्यांवर व देशावर कसे घडत आहेत, त्यांत सुधारणा कशी करतां येईल, या बाबतींत सरकारचें वर्तन कसें आहे, तें कसें असलें पाहिजे; लोकांनीं काय केलें पाहिजे, वगैरे गोष्टींच्या चर्चा वर्तमानपत्रांतून व व्याख्यानांतून होऊं लागल्या तर त्याकडे विद्यार्थ्यांचें लक्ष गेल्याशिवाय राहाणार नाहीं. व जे विद्यार्थी या विषयासंबंधीं विचार करतील ते आपलीं मतें लोकांपुढें टेवल्याशिवाय राहणार नाहींत. कालेजांतून व हायस्कूलांतून जी विद्या देण्याची रीत चालू आहे त्यांत दोष नाहींत असें ह्मणतां येत नाहीं. असल्या दोषी विद्येचा ज्यांच्यावर संस्कार घडावयाचा त्यांनीं त्याबद्दल विचार करूं नये, तर त्याचा विचार कोणी करावा ? शारीरीक व्यायाम घेत असतां त्यापासून शरीरास एखादें व्यंग उत्पन्न होऊं लागलें, किंवा होईल असें कळून आलें तर तें व्यंग होईपर्यंत त्या माणसानें तो विद्यार्थी आहे ह्मणून स्वस्थ बसावें असें सांगणें योग्य होईल काय ? विद्याखात्याशीं विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष संबंध आहे, त्यांत सुधारणा करून घेणें हें त्यांचें कर्तव्य आहे. त्यासंबंधीं त्यांनीं विचार केला व त्यांतील दोष सरकारचे नजरेस आणिले तर त्याबद्दल त्यांस दोष देतां येणार

नाहीं, व हा " आव्यापारेषु व्यापार " होणार नाहीं. मात्र असें करतांना त्याचें वर्तन व भाषा सभ्यपणाची असावी. विचारसरणी चांगली असावी, व विषयाचें ज्ञान चांगलें करून घेऊन नंतर लिहिण्यास अगर बोलण्यास सुरुवात करावी, व हें काम करतांना कालेजांतील मुख्य कर्तव्य—परीक्षेचा अभ्यास—ह्मणजे परीक्षेस नेमलेले विषय परिपूर्ण आवगत करून घेणें—योग्य रीतीनें बजावलें पाहिजे हायस्कूलास व कालेजास उन्हाळ्यांत दीड महीना सुटी असते. आक्टोबर महीन्यांत बरीच सुटी असते. नाताळची सुटी असते. इष्टरची सुटी मिळते. यावेळीं मुलें शाळेंत व कालेजांत राहात नाहींत. घरोघर जातात. घरीं गेल्यावर आप्त, सोयरे, इष्टमित्र यांच्या भेटी होतात. सुटीच्या दिवसांत अभ्यास कमी होतो. कालेजांतील अभ्यास करून सुटीचे दिवसांत सभेस जाण्यास हरकत येत नाहीं. इतर पुस्तकें वाचण्यास वेळ मिळतो. वर्तमान पत्रें वाचण्यांत येतात. राजकीय विषयांची चर्चा कानावर पडते, व्याख्यानें ऐकावयास मिळतात. घरांत, बाहेर राजकीय बाबतींत चर्चा चालल्यामुळें त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या मनावर होतो. विद्यार्थ्यांचे आईबाप व पालक या गोष्टी त्यांचे समक्ष बोलत असतात, त्यांचीं मतें मुलांस कळतात. आईबापांचा व पालकांचा आचार पाहून तसा आचार मुलें करीत असतात. घरांत देशी साखर वापरावी असें त्यांस घरींच शिक्षण मिळतें. देशी कपडा वापरावा हें त्यांस घरांतच कळतें. देशाची स्थिति वाईट होत चालली आहे. या चर्चा ते घरीं ऐकतात. परदेशी माल वापरूं नये हा धडा घरींच मिळतो. कालेजांत गेल्यावर यापैकीं जित-

कें वर्तन विद्यार्थ्यांस करतां येईल तितकें करतील. जे विद्यार्थी त्यांच्याप्रमाणें वर्तन करीत नसतील त्यांचीं मनें वळविण्याचा प्रयत्न करतील, असें करणें ह्मणजे हल्लींचे स्थितींत राजकीय चळवळ करणें असेंच होईल. कारण देशीचा प्रचार करणें व त्याकरतां वाणीनें व कृतीनें खटपट करणें ही राजकीय बाबतीची चळवळ करणें आहे, हें करण्यास फार वेळ लागत नाहीं. कालेज सुटल्यावर अगर सुटीचे दिवशीं असल्या गोष्टी अभ्यासांत व्यत्यय न आणतां करतां येतील. कांहीं गोंगाट न करतां व्यवस्थित रीतीनें कांहीं विद्यार्थी जमले व त्यांनीं या विषयांची वाटाघाट केली तर त्यापासून दुसऱ्या लोकांस त्रास होणार नाहीं, व कालेज्याच्या नियमाविरुद्धहि वर्तन होणार नाहीं. जें वर्तन करण्याबद्दल विद्यार्थ्यांस घरींच शिक्षण मिळालें आहे, तें सोडून देण्यास सांगितलें असतां त्यांचा परीणाम होणार नाहीं. विद्यार्थी कालेजांत असतांना अगर शाळेंत जात असतांना त्याच्यावर शिक्षकांचा अगर प्रोफेसरांचा किंवा त्यांच्या मार्फत सरकारचा किती अंमल रहावयाचा असा प्रश्न उत्पन्न होतो. मुलगा शाळेंत गेल्यापासून तो शाळेंतून घरीं परत येईपर्यंत तो वर्गावरच्या मास्तरच्या प्रत्यक्ष ताब्यांत असतो. मास्तर शिकवीत आहे तोंपर्यंत त्यानें चित्त देऊन ऐकिलें पाहिजे. व मास्तरच्या अगदीं आज्ञेंत वागलें पाहिजे. बोलण्याचालण्यासंबंधीं व इतर वर्तनासंबंधीं वर्गावरील मास्तरानें अगर हेडमास्तरानें जे नियम करून ठविले असतील ते विद्यार्थ्यांनीं शाळेंत असतां व शिकत असतां अक्षरशः पाळलेच पाहिजेत. त्या नियमाचें उलंघन केल्यास त्याबद्दल शिक्षा देण्याचा अधिकार मास्तरास आहे. या

17-230

काळांत हा अधिकार शिक्षकांस आईबापाकडून व विद्यार्थ्यांच्या पालकांकडून मिळालेला असतो. मधलें सुटींत मुलें शाळेंत अगर शाळेच्या कांपाउंडांत खेळत असलीं तर त्यांजवर शाळामास्तरांस नजर ठेविली पाहिजे. परंतु शाळेंतील मुलें घरीं आपल्या आईबापांच्या व पालकांच्या ताब्यांत आल्यावर त्यांच्यावर शिक्षकांचा अंमल किती राहावयाचा याबद्दल कांहीं नियम नाहीं. व त्याबद्दल नियम करतां येईलसें वाटत नाहीं. ज्या शाळेस लागून विद्यार्थ्यांकरतां जेवणाची व रहाण्याची सोय असते. तेथील विद्यार्थ्यांवर देखरेख करण्याकारितां कोणीतरी शिक्षकाची नेमणूक केलेली असते. व ते बोर्डिंगमध्यें आहेत, तोंपर्यंत त्यांजवर त्या शिक्षकाची नजर राहाते. तेथील नियम विद्यार्थ्यांस पाळले पाहिजेत, अगर तें ठिकाण सोडलें पाहिजे. या ठिकाणीं विद्यार्थी आहेत तोंपर्यंत त्यांच्यावर नजर ठेवणें व त्याचें वर्तन चांगलें राखणें, व त्यांस जपणें हें आईबापांचें व पालकांचे अधिकार या शिक्षकास मिळालेले असतात असें मानण्यास हरकत नाहीं. मुलें वेळच्यावेळीं शाळेंत येत नाहींत, कारणांवाचून गैरहजर राहतात, अभ्यास करीत नाहींत, उनाड होत आहेत, असें मास्तरच्या नजरेस आलें तर मुलांस मास्तर उपदेश करतात व शिक्षाहि देतात. मुलांचा अभ्यास चांगला व्हावा, त्यांचे वर्तन चांगले असावें व त्यांस वळण चांगलें लागावें ह्मणून मास्तरलोकांचा प्रयत्न चालू असतो.

(३०) कांहीं विद्यार्थी अगदीं गरीब असतात ते कोणाकडे तरी वार लावून अगर मधुकरी मागून आपला निर्वाह करीत असतात. कांहींस आईबाप असतात, परंतु ते बहुत करून दूर खेड्यापाड्यां-

वर रहात असतात. त्यांची प्रत्यक्ष नजर या मुलांवर नसते. शहरांत राहून हीं मुलें विद्याभ्यास करितात. यांस पालक कोणी नसतो असें ह्मटलें तरी चालेल. हीं मुलें गरजूअसतात. यांस जो कोणी जेवणास घालील अगर त्यांस फीकरितां व बुकांकरितां थोडी बहुत मदत करील त्यांच्या हातांत ही मुलें जाण्याचा संभव असतो. कांहीं विद्यार्थ्यांचें घरीं जाणता पुरुष कोणी नसतो, कांहींच्याघरीं विधवा असतात, कोठें पुरुष माणसें नोकरीनिमित्त बाहेर गावीं राहात असतात; तर कोठें बायकांस शिक्षण नसतें त्यामुळें मुलांचा अभ्यास कसा चालला आहे हें त्यांस समजत नाहीं; मुलांस आपल्या कह्यांत ठेऊन त्यांस चांगलें वळण लावण्यासारख्या स्त्रिया आपल्यांत क्वचितच सांपडतील यामुळें असलीं मुलें घरांबाहेर कशी वागतात, काय करतात, कोणाच्या संगतींत आहेत या गोष्टी त्यांस समजत नाहींत. या मुलांसही कोणी पालक ह्मणजे त्यांच्यावर खरोखर देखरेखकरणारा नाहीं असें ह्मटलें तरी चालेल.

(३१) कांहीं मुलांस आईबाप असतात; परंतु ते अज्ञान असतात, स्वतः शिकलेले नसल्यानें शाळेंत मुलांचा अभ्यास कसा चालला आहे, तो काय वाचतो, कोठें जातो, व घराबाहेर कोणते उद्योग करतो हें त्यांस समजत नाहीं. या मुलावरही विद्येसंबंधी कोणाची नजर आहे असें ह्मणता यावयाचें नाहीं.

(३२) कांहीं मुलांचे बाप अगर पालक सुशिक्षित असतात, परंतु विद्येसाठीं त्यांना आपलीं मुलें दुसऱ्या ठिकाणीं ठेवावीं लागतात. सरकारी नोकरी करणाऱ्या लोकांस असा प्रसंग जास्त येतो. मुलें शहरांत एकटीं राहातात मुलें श्रीमंताचीं असल्यास हातांत पैसा

असतो त्यांवर कोणाची नजर नसते, नानातऱ्हेचे सोबती मिळतात, अभ्यासापेक्षां उनाडपणा करण्यांतच वेळ जास्त जातो व बरींच मुलें आळशी होऊन हळुहळु अभ्यास सोडून देतात; व कांहीं दुर्व्यसनी होतात. या मुलांस शहरांत पालक कोणी नाहीं असें ह्मटलें असतां चालेल. कांहीं मुलांचे बाप शिकलेले असतात, मुलें त्यांच्या जवळ वाढत असतात, परंतु ते आपल्या पोट भरण्याच्या अगर द्रव्य मिळवण्याच्या उद्योगांत इतके गढलेले असतात कीं, त्यास मुलांच्या विद्येकडे लक्ष देण्यास सवड नसते. कित्येक पैसेवाले लोक मुलांस मास्तर ठेऊन देतात, व नंतर मुलांच्या विद्येसंबंधीं आपलें कर्तव्य कांहीं राहिलें नाहीं असें समजतात. या मुलांचा अभ्यास चांगला होतो, तरी तीं बाहेर कशीं वागत आहेत, काय करतात, हें आईबापास समजत नाहीं.

कित्येक आईबाप मुलांचे फाजील लाड करून त्यास बिघडवितात. हीं मुलें स्वछंदी होतात, अभ्यास सोडतात व बहुतकरून व्यसनास लागतात.

मुलांच्या शरीरप्रकृती चांगल्या राखणें, त्यांचेकडून दररोज नियमितवेळीं व्यायाम करून घेणें, त्यांस धर्माचें शिक्षण देणें, नीतीचें वळण लावणें, त्यांचा अभ्यास कसा चालला आहे याबद्दल दररोज तपास करणें, ज्या गोष्टी त्यास समजत नसतील त्या समजून देणें अगर त्यास समजून देण्याची सोय करणें व मुलांची विद्येसंबंधीं व वर्तनासंबंधी विशेष काळजी घेणारे लोक मास्तर व प्रोफेसर लोकांत जास्त मिळतील. लहानपणापासून शारीरिक, मानसीक, धार्मिक व नैतिक सुधारणा करणें, या गोष्टीकडे लक्ष देणारे आईबाप फारच विरळा सांपडतील.

स्त्रियांस विद्या नाहीं, यामुळें त्यांचा मुलांस घरांत शिकविण्याचें व वळण लावण्याचें कामीं जितका उपयोग व्हावा तितका होत नाहीं. पुष्कळ बायकांस घरांतील काम करावें लागतें यामुळें मुलांकडे लक्ष देतां येत नाहीं. सरकारी नोकरांस पुष्कळ काम असल्यामुळें त्यांचें लक्ष मुलांकडे फारसें नसतें. याप्रमाणें एकंदर गोष्टीचा विचार केला तर असें दिसून येईल कीं, आईबापांचे व पालकांचे अज्ञानामुळें, गैर समजुतीमुळें, गैरसोयीमुळें व कित्येक ठिकाणीं आळसामुळें व बेफिकिरपणामुळें आईबापांची व पालकांची मुलांवर जशी नजर असावी तशी राहात नाहीं. मुलांचे आचार व विचार व पालकांचे आचार व विचार यांत फरक पडतो. मुलें घराबाहेर इतर लोकांच्या नादीं असतात. व ज्यांच्या संगतीनें त्यांचा काल जात असतो त्यांचा आचार व विचार मुलांस लागत असतो. कांहीं दिवस ही गोष्ट आईबापांच्या लक्षांत येत नाहीं. परंतु आईबापांची मतें व विचार यांत व मुलांच्या आचारांत फार फरक होऊं लागला ह्मणजे ही गोष्ट वडील माणसांच्या लक्षांत येतें. कित्येकवेळां मुलें वाईट संगतीस लागून बिघडेपर्यंत वडील माणसांस समजत नाहीं.

कांहीं मुलें जात्या चांगल्या स्वभावाची असतात. अभ्यासी असतात, तीं वाईट संगतीस लागत नाहींत. व अभ्यासाशिवाय इतर गोष्टींत लक्ष्य देत नाहींत. कांहीं मुलें चंचल स्वभावाची असतात. त्यांचें लक्ष्य अभ्यासाकडे कमी असतें. तीं हुशार असतात, त्यांस अभ्यास करण्याचा कंटाळा असतो, व दुसरे उद्योग व उनाडकी करण्याकडे त्यांचा कल असतो. कांहीं मुलें

जात्य  ाचीं मंद असतात, व अर्धवट असतात. हीं मुलें नेहमी दुसऱ्या मुलांच्या तंत्रानें चालणारीं असतात, त्यांस स्वःताची अक्कल कमी असते, त्यांस नादी लावण्यास वेळ लागत नाहीं. अशा मुलांवर देखरेख चांगली असली तरच त्यांस वळण चांगलें लागेल, नाहीं तर तीं कोणाच्या तरी नादीं लागून बिघडण्याचा संभव आहे. मुलांची व त्यांच्या आईबापांची स्थिति वर लिहिल्याप्रमाणें आहे. आपल्या मुलांची योग्य खबरदारी घेणारे लोक फारच थोडे आहेत, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. मुलांस घरीं खाण्यापिण्यास द्यावें, कपडालत्ता द्यावा, अजारी पडल्यास औषधपाणी करावें, त्यास शाळेंत पाठवावें, पुस्तकें घेऊन द्यावीं, व परीक्षेचेवेळीं फी भरावी, यापेक्षां जास्त काळजी घेणारे लोक थोडे आहेत. मुलांच्या अभ्यासासंबंधीं व त्यांस चांगलें वळण लावण्याची जबाबदारी शाळामास्तरांवर आहे, असें पुष्कळ लोक समजतात. पुष्कळ लोकांनीं या गोष्टीबद्दल विचार केलेला नसतो, संसाराचें गाडें चालेल तसें ढकलीत असतात. मुलगा शाळेंत असतां त्यास शिकविणें व त्याचें वर्तन चांगलें ठेवणें व त्याची उत्तरोत्तर सुधारणा करणें हा अधिकार शिक्षकाचा आहे, व तो त्यास आईबापांकडून प्राप्त झाला आहे हें मागें सांगितलेंच आहे.

मुलांस धाकांत ठेवावें, आपल्यासमक्ष लिहिण्यावाचण्यास बसवावें, अगर पंतोजीकडे किंवा गुरूचे ताब्यांत मुलांस देऊन त्याचा विद्याभ्यास करून घ्यावा अशी स्थिति राहिली नाहीं, सर्व मुलांस शिकण्याकरितां शाळेंत जावें लागतें त्याठिकाणीं त्यांचा अभ्यास चांगला व्हावा असा हेतु आहे.

मुलांस चांगले शिक्षक मिळावे ह्मणून सरकार मुद्दाम शिक्षण देऊन मास्तरलोक तयार करीत आहे.

मुलांस शिक्षण देण्याकरितां निराळें खातें आहे. त्या खात्याचा मुख्य अधिकारी मुलांस कोणत्या प्रकारचें शिक्षण द्यावें हें ठरवितो. त्याप्रमाणें शाळांतून शिक्षण चालू असते, मुलांचे आईबाप यासंबंधी फारसा विचार करीत नाहींत, मुलांस शिकविण्याकरतां मास्तर लोक तयार केलेले असतात ते नमुना घालून दिला असेल त्याप्रमाणें शिकवीत असतात, लहानपणीं मुलांस शिक्षणांत काय दोष आहेत हें समजत नसते. यामुळें तें जें शिक्षण दिलें जाईल तें ग्रहण करीत असतात. शिकविण्याचा क्रम इयत्तेवार घालून दिलेला आहे, एक वर्षांत किति अभ्यास झाला पाहिजे हें ठरऊन देतात, शिकविण्याचीं पुस्तकें नेमलेलीं असतात. मुलगा किती शिकला हें परीक्षेचे वेळीं त्यांस मिळणाऱ्या गुणांवरून समजतें, दरसाल मुलांची शाळाखात्यामार्फत परीक्षा होत असते. त्या परीक्षेंत जितकीं मुलें पास होतील त्या मानानें मास्तरची शिफारस होते. परीक्षा कोणत्या धोरणावर होत असते, साधारण नेहमीं विचारण्यांत येणाऱ्या गोष्टी कोणत्या असतात व त्या कशारीतीनें मुलांकडून तयार करून घ्याव्या हें मास्तर लोकांस अनुभवानें कळून येतें. मुलें या धोरणावर तयार होणें साहाजीक आहे. शाळेंत हजर होण्याची वेळ ठरलेली असते, मास्तर लोकांची बसण्याची जागा निराळी असते, तेथून ठरलेल्यावेळीं ते मुलांस शिकविण्यास जातात, अभ्यास नेमून दिलेला असतो, वर्गांत मुलें पुष्कळ असतात, एका तासास एक विषय नेमलेला असतो,

सर्व मुलांशीं वादविवाद करण्यांस व प्रत्येक मुलांस विषय समजला आहे किंवा नाहीं हें पाहाण्यास वेळ नसतो, मास्तरचा व विद्यार्थ्यांचा संबंध अगदीं यंत्राप्रमाणें होतो, खाजगी रितीनें एकमेकांचें भाषण फारसें होण्यास वेळ व संधी नसते, मास्तर लोकांस पगार थोडा असतो, शिकविण्याचें काम मेहनतीचें व उरफोडीचें आहे, तें शाळेंत करून शिवाय वर्गांतलि मुलांस घरीं शिकवावें अशी इच्छा थोड्या पगाराच्या मास्तरास होत नाहीं, गुरुशिष्यांचा संबंध अगदीं तुटक, नियमितकाळपर्यंत व भाडोत्री कामाकरितां मुलें परीक्षेस तयार करण्यापुरता होतो गुरुशिष्यांमध्यें प्रेम वाढण्यास संधी मिळत नाहीं. मुलांच्या आईबापांचा व शिक्षकवर्गांचा कांहींच संबंध नसतो. त्यांची व मास्तर लोकांची ओळखसुद्धां नसते व पुष्कळ आईबापांस व पालकांस आपल्या मुलांचे शिक्षक कोण आहेत व कसे आहेत हें माहीत नसतें.

सार्वजनीक शाळेंत परीक्षा देण्यास मुलें तयार होत असतात. त्यांत सकाळचें साडे आकरा वाजल्यापासून ते साडेपांच वाजेपर्यंत मुलांचा वेळ जातो. नंतर संध्याकाळीं दिवे लागेपर्यंत मुलांचा वेळ खेळण्यांत जातो. यावेळीं त्यांचेबरोबर कोणी शिक्षक अगर वडील माणूस नसते. हा वेळ बहुतकरून खेळण्यांत, व त्याबरोबर थट्टा मस्करी करण्यांत, कधीं कधीं फाजीलपणा करण्यांत जातो. लहानवयाचीं मुलें व मोठाला मुलें एकेठिकाणीं खेळतात. त्याचा परीणाम लहानवयाच्या पोरावर चांगला होत नाहीं. सकाळीं व रात्रीं मुलें घरीं असतात. यावेळीं तीं अभ्यास करीत असतात. मुलांचें व आईबापांचें फारसे संभाषण होत नाहीं प्रत्येक दिवशीं मुलांस काय अभ्यास नेमून दिला आहे, तो त्यानें

केला किंवा नाहीं, ते विषय त्यास समजले कीं, नाहीं, याबद्दल तपास करणारे आईबाप व पालक फारच थोडे आहेत. पुष्कळ मुलें सात आठ वर्षें पर्यंत हायस्कूलांत शिकत असतात. एका वर्गांतून दुसऱ्या वर्गांत जातात. दररोज पांच तास शाळेंत शिकत असतात. परंतु कोणत्याही विषयाचें ज्ञान त्यांस झालेलें नसतें. शंभरापैकीं पंधरावीस मार्क मिळविण्याइतकीसुद्धां त्यांचे आंगीं विद्वत्ता आलेली नसते. याबद्दल मास्तर लोकावर कांहीं जोखीम नाहीं. वर्षांतून दोन वेळां परीक्षा होते. त्यावेळीं मुलांचे मार्क व मास्तरचे सरटीफिकीट पालकांकडे येतें त्यांत मुलांचें वर्तन कसें आहे याबद्दल शेरा असतो. त्यावरून त्याचें शाळेंतील वर्तन कसें आहे हें समजतें. धर्म, न्याय, नीति, याचें शिक्षण शाळेंत मिळत नाहीं. मुलें मोठीं माणसें झाल्यावर त्यांस जीं कर्तव्यें करावयाचीं असतात त्यांचें शिक्षण मुलांस मिळण्याची सोय नाहीं. घरांत आईबापांचें व वडील मनुष्यांचें वर्तन पाहून त्यावरून ह्या गोष्टी मुलें शिकत असतात. नागरीक या नात्यानें जीं कर्तव्यें करावयाचीं त्यांचें शिक्षण नसते. "हिंदुस्थानचा नागरीक" व "एंपायर रीडर" या पुस्तकांचें अध्ययन करण्यापासून चांगले ...िक तयार होतील असें ह्मणतां येत नाहीं. हिंदुस्थान देशांत नागरीक कोणास ह्मणावा याबद्दलचा वाद आहे. त्रि... गुण माणसाचें आंगीं असले पाहिजेत असे इंग्रज ...न करतात तेच गुण हिंदुस्थानांतील प्रजेच्या आंगीं ... जातात. स्वतंत्र देशांत जे नागरिक असतास त्यां... व वर्तन परतंत्र देशांत खपणार नाहींत हें

थोडासा विचार केला असतां असें दिसून येईल कीं, सर्व जगाचें पाऊल सुधारणेंत पुढें पडत आहे. सुधारलेल्या राष्ट्रांत इंग्लंडदेश अग्रणी आहे. इंग्रज लोकांचा सहवास हिंदुस्थानदेशांत अजमासें शंभर वर्षे आहे. त्यांचें वर्तन हिंदुस्थान देशापुढें आहे. हिंदुस्थानच्या लोकांनीं सुधारावें व हिंदुस्थान देशाची भरभराट व्हावी अशी इंग्रज लोकांची इच्छा आहे, व त्याप्रमाणें ते प्रयत्न करीत आहेत, ते प्रयत्न सफल होत चालले आहेत. हिंदुस्थाच्या लोकांस आपण किती परतंत्र आहोंत, व आपण सुधारलेल्या राष्ट्राच्या किती मागें आहोंत हें समजूं लागलें आहे. हिंदुस्थानच्या लोकांस विद्या मिळत आहे, त्यास प्रजेचे हक्क काय आहेत याचें थोडेंबहुत ज्ञान होत चाललें आहे. प्रजा शहाणी होत गेली कीं, त्याचेंवर राज्य करण्याची पद्धति त्या मानानें बदलली तर राजा व प्रजा यांच्यांत प्रेम वाढत जाते. लोकांस इंग्रजी विद्या मिळाली आहे, पुष्कळ लोक विलायतेस शिकून येत आहेत, इंग्रज लोकांचा आचार विचार चालीरीती, त्यांचा धर्म, नीति, त्यांची व्यापार धंदा करण्याची तऱ्हा, राज्य मिळविण्याची व ती राखण्याची व्यवस्था कोणत्या तत्वावर चालते याचें ज्ञान लोकांस होत आहे. इंग्रज लोकांचे गुण अवगुण हिंदुस्थानच्या लोकांस समजून चुकले आहेत. इंग्रज लोक ह्मणजे अतिश्रेष्ट प्राणी, व आपण अगदीं हीन प्राणी आहोंत, अशा समजुती हल्लीं राहिल्या नाहींत.

सरकार करील ती पूर्वदिशा, हें तत्व लोकांस कबूल नाहीं, यामुळें हिंदुस्थान देशांतील राजकीय वातावरणांत थोडा थोडा फरक पडतां पडतां आलीकडे तें वातावरण अगदींच बिघडत

चाललें आहे. बिघडलेल्या वातावरणांत धूळ व कचरा एकसारखा उडत आहे. सरकारचे व लोकांचे डोळे धुरळ्यानें भरून गेल्यामुळें खरी स्थिति दोघांसहि दिसत नाहीं. असल्या अस्वच्छ हवेंत पोक्त विचारांस जागा राहिली नाहीं. दृष्टी अंधुक झाल्यामुळें जिकडे तिकडे शंका व गैरविश्वास दिसूं लागला आहे. गैरसमजुतीनें दांडगाई करण्याची इच्छा दिसूं लागली आहे. खवळलेल्या वातावरणांत राजा व प्रजा आपली शक्ति एकमेकांस दाखविण्याचा प्रयत्न करीत आहेत. या वादळांत अज्ञान, अजाण व अविचारी माणसे गोंगाट करीत आहेत, व त्यांस खरी स्थिति न कळल्यामुळें कोणता मार्ग स्वीकारावा व तो कां स्वीकारावा हें कळत नाहींसें झालें आहे. या सपाट्यांत लहान मुलें, शाळें तील विद्यार्थी व कॉलेजांतील विद्यार्थी सांपडले आहेत. त्यांच्या भोंवती ज्या प्रकारच्या वातावरणाचा गराडा पडला आहे त्याचा परीणाम त्यांच्यावर होत आहे. विद्यार्थी वर्गाचें हल्लींचें जें वर्तन आहे त्याबद्दलचा दोष त्यांचेकडे फार थोडा आहे.

तीस चाळीस वर्षांपासून लोकांची स्थिति पालटत आहे. लोकांस विद्येबरोबर ज्ञान होत आहे. धर्म भोळेपणा कमी होत आहे, राजा ह्मणजे विष्णुचा अवतार ही समजूत दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. सुधारणेच्या प्रगतीस जे आचार विचार आड येण्यासारखे असतील ते लोक सोडीत आहेत, लोकांची राहाणी बदलली आहे. कुटुंब व्यवस्था सुधारत आहे. बायकांस शिक्षण मिळत आहे. स्त्री व पुरुष यांचे एकमेकांशीं वर्तन दिवसेंदिवस सुधारत आहे. मुलांस वागविण्याची व त्यांची विद्या करण्याची रीत सुधारत आहे, लोकांचे आचारांत

व विचारांत स्वतंत्रपणा भरत चालला आहे. मुलांचे आईबाप व पालक यांचे वर्तनाचा परिणाम मुलांवर होत आहे. मुलांचें व विद्यार्थ्यांचे आचारांत व विचारांत स्वतंत्रपणा येत चालला आहे. धाकदपटशाचें राज्य सर्व व्यवहारांत कमी होत चाललें आहे. प्रत्येक माणसास आपली किंमत कळूं लागली आहे.

नोकर लोकांमध्यें सुद्धां दिवसेंदिवस वागण्यांत एक प्रकारची स्वतंत्रता दिसूं लागली आहे. तोच विकार अथवा तीच इच्छा विद्यार्थी वर्गांत दिसूं लागली व त्याप्रमाणें त्यांचें वर्तन होऊं लागलें तर त्याबद्दल दोष कोणाचा? हा कालाचा व सुधारणेचा महिमा आहे. तीस किंवा चाळीस वर्षांपूर्वीची स्थिति राहिली नाहीं. तीस चाळीस वर्षांपूर्वी नोकर लोक जसे मालकाशीं वागत होते, नवराबायकोचें एकमेकांशीं जें वर्तन होतें, बापलेकांचें जसें वागणें होतें, गुरु शिष्यांचें जें एकमेकांशीं वागणें होतें, तसें आतां राहिलें नाहीं. याबद्दल कोणी तक्रार केली तर त्यास काय ह्मणतील.

आईबापाबरोबर, पालकाशीं, शिक्षकांशीं, व प्रोफेसर लोकांशीं विद्यार्थ्यांचें वर्तन पूर्वी इतकें आदबीचें राहिलें नाहीं. यांस कारण दुनियेतील एकंदर प्रगति, त्या बरोबर उत्पन्न झालेली स्वतंत्र विचार व स्वतंत्र आचार करण्याची इच्छा, विद्यार्थ्यांचे, आईबापांचे आचार व विचार, त्यांस मिळणारें घरचें शिक्षण, व शिक्षकांची विद्यार्थ्यांसंबंधीं व आपल्या अधिकारासंबंधीं समजुती, व त्या कामीं विद्याखात्याची यांत्रिकरचना व गुरुशिष्यांचा व पालकांचा तुटक संबंध, व त्यामुळें परस्पर प्रेमाचा अभाव हें आहे. विद्यार्थी वर्गाचें वर्तन बरोबर नाहीं. असें ह्म-

णें ह्मणजे त्यांचें आईबाप, शिक्षक, गुरु, व त्यांस मिळणारी विद्या व ती देणारे खात्यांतील अधिकारी सर्व आपलें काम बरोबर करीत नाहींत, असें सिद्ध करून दाखविण्यासारखें आहे. व या सर्वांचा दोष सरकारच्या पदरांत येत आहे.

सरकारचें लोकांशीं व लोकांचें सरकारशीं जें वर्तन तीस चाळीस वर्षांपूर्वीं होतें तें आतां राहिलें नाहीं. त्यांत एकसारखा फरक पडत चालला आहे. पूर्वीं सरकारचे अंमलदार यांस लोक देवांप्रमाणें समजत असत. त्यांची स्वारी कोठेंहि गेली कीं त्यांची देवांप्रमाणें व्यवस्था लोक करीत असत. तें मान हळुं हळुं बदलत चाललें आहे. सरकारी अंमलदारांची स्वारी ह्मणजे लोकांस कांहीं विशेष वाटत नाहीं. त्यापेक्षां लोकांच्या पुढाऱ्यांच्या स्वाऱ्यांस हल्लीं जास्त महत्व आलें आहे. कांग्रेसचा प्रेसिडेंट होणारे जे लोकनायक आहेत अथवा तितकी योग्यता ज्यांचें आंगीं आहे, जे देशाकरितां आपलें आयुष्य खर्च करीत आहेत त्यांचें महत्व लोकांस जास्त वाटूं लागलें आहे. सरकारचे अमलदारांस लोक भितात, त्यांच्या आज्ञा पाळतात. त्यांच्या हुकुमाप्रमाणें वागतात, व त्यांच्या दर्ज्यांस योग्य तितका मान त्यांस देतात. परंतु प्रजेच्या हिताकरितां जे लोक खरोखर झटत आहेत, त्यांच्या ठिकाणीं लोकांची भक्ति विशेष जडत चालली आहे. आपणांस जे हक्क मिळणें वाजवी आहे ते हक्क सरकार देत नाहीं, अशी लोकांची पूर्ण समजूत आहे. ते हक्क मिळविण्याकरितां जे लोक परिश्रम करीत आहेत त्यांस हल्लींचेंकाळीं जास्त मान आहे. त्यांच्या गाड्या ओढण्यास लोक तयार आहेत. त्यांच्याजवळ पैसा नसला तरी त्यांच्या विद्वत्तेस व त्यांच्या देशभक्तेस लोक

मान देत आहेत. हा प्रकार पूर्वी नव्हता. लोकांस दास्यत्वांत राहाण्याचा व दारिद्र्यांत दिवस काढून दुष्काळांत अन्नावांचून व प्लेगमध्यें पटापट मरण्याचा कंटाळा आला आहे. या स्थितीं-तून वर काढण्याकरितां जे इंग्रज लोक हिंदुस्थानच्या लोकांस मदत करीत आहेत त्यांस हिंदुस्थानचे लोक फार मान देतात व त्यांस ते देवाप्रमाणें भजतात. कालेजांतील प्रोफेसरांनीं ही गोष्टसुद्धां लक्षांत वागविण्यासारखी आहे.

आमचा विद्यार्थीवर्ग ह्मणजे सुशिक्षितवर्गांत जाणारी पुढची पिढी होय. त्यांस जितकें उत्तम शिक्षण मिळेल, ते जितके विचारी, स्वतंत्र विचार करणारे, आपल्या मनाप्रमाणें वागणारे, देशाभिमानी व देशभक्त निपजतील तितकें देशाचें कल्याण जास्त होईल. यांचें वर्तन जितकें निर्मल, यांचीं धर्माचीं, न्यायाचीं व नीतीचीं तत्वें जितकीं उदात्त राहातील, यांस देशसेवा करण्याची जितकी जास्त शक्ति व इच्छा प्राप्त होईल त्या मानानें यांचा देशास जास्त उपयोग होईल. स्वतः शिकून ज्ञान संपादन क-रून लोकांस ज्ञान देणारें व त्यांच्या गैरसमजुती घालवून त्यांस सर्वपरी सुधारण्याचें काम यांच्या शिरावर येणार आहे. यांनीं आपल्या वर्तनावर टीका होण्यास सवड देऊं नये. ज्ञान संपादन कर-ण्याकरितां जीवापाड मेहनत घ्यावी. एक क्षण देखील फुकट घा-लवितां कामा नये. बिघडलेल्या वातावरणांत ज्यांस राहावयाचें आहे, त्यांचा प्रवेश यांच्या शरीरांत झाल्यावांचून राहात नाहीं. तरी शांतपणें विचारकरून चित्तशुद्धि करावी. विद्यार्थी असतां गुरुच्या आज्ञेंत राहाणें व गुरुचें प्रेम संपादन करणें हें जसें शिष्याचें कर्तव्य आहे. त्याचप्रमाणें गुरुनें आपल्या योग्यतेनें, आपल्या अंगच्या

चांगल्या गुणानें, आपल्या नीतिमान व धर्मशील सद्वर्तनानें व विद्वत्तेच्या व ज्ञानाच्या व सुशील वागण्यानें शिष्यास प्रिय होणें हें गुरुचें कर्तव्य आहे. नुसती आंगीं विद्वत्ता असली व परीक्षेस ठेवलेले विषय चांगलें शिकविले ह्मणजे गुरुचें कर्तव्य पुरें होत नाहीं. आपल्या वर्तनानें शिष्यवर्गाचें मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न झाली पाहिजे, व गुरुच्या आंगच्या तेजानें शिष्यवर्ग दिवसेंदिवस सुधारत गेला पाहिजे. विद्यार्थ्यांवर वजन ठेवतां आलें पाहिजे, व त्यांची मनें गुरुनें आकर्षण करून घेतलीं पाहिजेत- विद्यार्थ्यांचीं मनें गुरूस आकर्षण करून घेतां आलीं नाहीं तर तो एक दोष आहे असें मानण्यास हरकत नाहीं.

आमचा विद्यार्थीगण शहाणपणानें व विचारानें राजकीय चळवळी करण्यास लायक झाला पाहिजे. त्यांची विनाकारण कोणी निंदा करीत असेल अगर त्यांस कमीपणा आणीत असेल तर त्याचा बंदोबस्त केला पाहिजे. परंतु त्यांचे अभ्यासांत मन कमी लागत असेल, आपला मुख्य उद्योग सोडून राजकीय चळवळ करण्यास ते प्रवृत्त होत असले तर त्याचाहि बंदोबस्त करणें जरूर आहे. आईबापांनीं व पालकांनीं विद्यार्थ्यांच्या वर्तनावर फार बारीक नजर ठेवावी. ते काय करतात, कोणाच्या नादीं आहेत याबद्दल तपास ठेवावा. व ते वयात येऊन त्यांचें विचार कायम होईपर्यंत त्यांस योग्य मार्गानें नेत असावें. मुलानें विद्या करण्याचें वय फुकट घालविलें, व त्याच्या बुद्धीचा दुरुपयोग करून खालच्या दर्जांत गेला तर त्या पासून आईबापांस व मुलांस फार हानी होते. त्याची किंमत पैशांत भरून येणार नाहीं. शाळेंतील मास्तर लोकांनीं व मुलांच्या पालकांनीं नेहमी

भेटावें व मुलांच्या वागणूकी संबंधीं विचार करावा. खेळण्याचे वेळीं मास्तर लोकांनीं मुलांबरोबर व विद्यार्थी बरोबर असावें. ज्या विद्यार्थ्यांचे आईबाप व पालक परगावीं राहात असतील त्यांच्या मुलांची वागणूक शाळेंत व घरीं व बाहेर कोणत्या प्रकारची आहे याबद्दल खबर पालकांस मिळण्याची सोय झाली पाहिजे.

शारिरीक शिक्षण देण्याकरतां गांवोगांवीं तालमींचे आखाडे चालू आहेत. तालीम करण्यास लहान मोठीं मुलें व विद्यार्थी एके ठिकाणीं जमतात. तालीम शरीरांस हितावह होईल अशा रीतीनें व्यायाम करून घेतला तर फायदा होईल परंतु या ठिकाणीं पुष्कळ मुलांनीं एके ठिकाणीं जमून राजकीय विषया बद्दल चर्चा करणें व दांडगाई करणें किंवा असभ्य रीतीचें वर्तन करणें ह्यापासून नुकसान होईल. व असले तालमीचे आखाडे मुलांस वाईट वळण लावण्याच्या शाळा होतील. याबद्दल तालमी चालविणारे लोकांनीं काळजी घेतली पाहिजे.

शहरांत व खेडें गांवांत माल मिळकतीचें संरक्षण करण्यास व चोरी व दरोडा पडूं नये व एकाची मिळकत दुसऱ्यानें त्याच्या संमति शिवाय घेऊं नये ह्मणून सरकार पोलिसाची योजना करीत असतात. व गुप्त पोलीस नेमतात. आपल्या देशांत ज्या मुलांच्या वर्तनावर नजर नाहीं. व त्यांस वळण लावण्याचा कोणी प्रयत्न करीत नाहीं अशीं मुलें व लहान मोठे विद्यार्थी पुष्कळ आहेत. असलीं मुलें व विद्यार्थी नीति शिक्षण व त्यांचें वर्तन या बाबतींत बिनवारशी आहेत असें समजण्यास हरकत नाहीं. या बिनवारशी मालाची कांहीं लोक चोरी करतात. व त्यांस आपल्या पंथांत घालतात. मुलांस घरीं खाण्यापिण्याची चांगली

सोय असते. शाळेंत जात असतात. अभ्यास करतात. परंतु त्यांची जशी विद्येंत गति व्हावी तशी होत नाहीं. व विद्येचा जो चांगला परिणाम घडावा तो त्यांच्यावर घडत नाहीं. पुष्कळ ठिकाणीं शिकण्याची चांगली सोय असतां मुलें आपांच्या योग्यतेस येत नाहींत. असल्या मुलांचे लक्ष विद्येशिवाय दुसऱ्या गोष्टींत असते. व त्यांची मनें हरण करून नेणारे चोर किंवा उचले ज्या ठिकाणीं जास्त होतील त्या ठिकाणीं मुलांवर व विद्यार्थ्यांवर त्याचा अनिष्ट परीणाम जास्त घडत जाईल. कांहीं मुलांस कालेजांतील बोर्डींगमध्यें व शाळेंतील बोर्डींगमध्यें राहाण्याची नावड उत्पन्न होते. त्या ठिकाणचें नियमित रीतीनें राहाणें व वागणें त्यांस आवडत नाहींसें होतें. हीं मुलें उनाड लोकांच्या नादीं असतात असें बहुशा आढळून येईल. आलीकडे कालेजांत विद्या संपादन केलेल्या तरूण लोकांस पूर्वीसारखा मान सरकारांत राहिला नाहीं. त्यांस पूर्वी प्रमाणें नोकरी देत नाहीत, त्यांची उघड निंदा होत आहे.

त्यांस मिळणाऱ्या विद्येची निंदा होत आहे. अशा प्रकारें विद्येचा, विद्या पिठाचा, विद्वानांचा, व विद्या संपादन करीत असलेल्या विद्यार्थ्यांचा छल होऊं लागला तर त्या बरोबर विद्यार्थ्यांस जे लोक असलीं विद्या देत असतात त्यांचा ही कमीपणा झाल्या शिवाय राहाणार नाहीं. विद्या, विद्यार्थी व शिक्षक हे एकमेकांस सोडून नाहींत. आपल्यास जी विद्या मिळत आहे ती चांगली नाहीं. उपयुक्त नाहीं. त्या पासून शारिरीक, मानसीक, धार्मीक व नैतिक उन्नति होत नाहीं. असें विद्यार्थ्यांस कळूं लागलें; हीच विद्या ग्रहण केली पाहिजे, दुसरा मार्ग नाहीं

असें जर विद्यार्थ्यांच्या ध्यानांत आलें तर जी विद्या मिळेल ती घेणें भाग आहे. असें समजून ती विद्या घेतील, परंतु ती विद्या मिळण्याचें ठिकाणा बद्दल अगर ती विद्या देणाराबद्दल विद्यार्थ्यांच्या मनांत फारशी पूज्यबुद्धि राहाणार नाहीं. व विद्यार्थी व शिक्षक यांचे दरम्यान प्रेम बेताचेंच राहील. शिक्षकांचे आज्ञेंत व कहेंत विद्यार्थी पूर्वी प्रमाणें राहात नाहींत या गोष्टीचा विचार करतांना शिक्षकांबद्दल विद्यार्थ्यांच्या ज्या तक्रारी असतील त्यांचाही विचार केला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या मनाचा व बुद्धीचा कल ओळखून त्याप्रमाणें नरम गरम वर्तन ठेवून त्यांस चांगल्या मार्गास लावणें हें शिक्षकांचे कर्तव्य आहे. प्रजोत्पादन करून मुलांचे आई बाप होतात. मुलाचें खरे पालक व मार्ग दर्शक फार थोडे आहेत. तसेंच सार्वजनीक शाळेंत अगर कालेजांत सरकारनें नेमलेले सार्वजनिक शिक्षक होतात. विद्यार्थ्यांस खरे पालक व खरे शिक्षक नसल्यामुळें त्यांची स्थिति असावी तशी नाहीं. विद्यार्थ्यांचा दोष आहे. पण त्याबरोबर दुसऱ्या अनेक गोष्टींचा विचार करणें जरूर आहे, हा विषय फार महत्वाचा आहे, याबद्दल चांगला विद्वान लोकांनीं विचार करावा. व पुढील पीढीचें कल्याण करावें.

फरग्युसन कालेजसारख्या संस्थेस इतर संस्थाप्रमाणें सरकारनें ग्रँट द्यावी. मेडीकल कालेजच्या विद्यार्थ्यांच्या सोई करतां कालेजाजवळ राहाण्याची व भोजनाची सोय करण्याकरतां वसती गृहे असावीं. शिक्षणाची पद्धत जास्त चांगली असावी, अशा बद्दल कालेजांतील विद्यार्थ्यांनीं सरकारकडे तक्रार केली, तर या मुद्दां राजकीय चळवळी समजावयाच्या

काय ? या करितां विद्यार्थ्यांनीं सभा केल्या व लेख लिहिले तरी ते हल्लींच्या मानाप्रमाणें राजकीय चळवळींत घालता येईल तसेंच प्रत्येक हायस्कूलांस जोडून एकेक होस्टेल ( भोजन वसतिगृह ) असावें. त्याची व्यवस्था कोणत्या प्रकारची असावी, त्याबाबतींत विद्यार्थ्यांस सोय गैरसोय काय आहे, ह्या बद्दल विचार करण्याचा व त्या योग्य अधिकाऱ्यांच्या नजरेस आणण्याचा विद्यार्थ्यांस हक्क आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. असल्या बाबतींत लिहितांना अगर बोलतांना विद्यार्थी कडक भाषा वापरूं लागले तर त्यांस समजून सांगावें. सरकारच्या विरुद्ध लिहितांना व बोलतांना कडक भाषा लिहिली पाहिजे असा बऱ्याच लोकांचा समज दिसतो. या लोकांच्या मनांस व बुद्धींस एक प्रकारचा रोग झाला आहे असें ह्मटलें तरी चालेल, या रोगाचा फैलाव फार झाला ह्मणजे त्याचा परीणाम विद्यार्थ्यांवर हो तो त्याबद्दल खबरदारी पालकांनीं व शिक्षकांनीं व प्रोफेसर लोकांनीं घ्यावी. व विद्यार्थ्यांस नेहमीं उपदेश करीत असावें, व आपण त्यांच्या खरोखर हिता करतां झटत आहोंत, त्यांस वाईट सवयीं अगर आचार विचारांत वाईट खोडी लागूं नयेत अशी आपली फार इच्छा आहे व त्याप्रमाणें आपण प्रयत्न करीत आहोंत असें शिक्षकांचें वर्तन विद्यार्थ्यांस दिसून आले तर तर विद्यार्थी गुरूंच्या आज्ञे बाहेर वागणार नाहींत.

हिंदुस्थान देशांतील लोकांचे आचार, त्यांची राहाण्याची पद्धत त्यांची कुटुंबरचना, चालीरीती, एकमेकाशी वागण्याची रीत, बोलण्याचालण्याची रीत, ही इंग्रज लोकांच्या रीतीहून वेगळी आहे. आमचा पोषाक करण्याची रीत, एकमेकास भेटण्याची

रीत वगैरे वेगळी आहे. ज्यास इंग्रजींत "एटीकेट" किंवा शिष्टसांप्रदायाप्रमाणें वागणें असें ह्मणतात. त्याचें महत्व आह्मांस फारसें वाटत नाहीं, परंतु त्या गोष्टीस इंग्रज लोकामध्यें फार महत्व आहे. व त्याप्रमाणें ज्यांचें वर्तन होत नसेल त्यास सभ्य मनुष्य समजत नाहींत. आह्मांस हें वर्तन समजत नाहीं कारण तें साहेबलोकांत वागूनच शिकतां येईल, व त्याबद्दल कांहीं पुस्तकें आहेत, परंतु आचाराच्या गोष्टी आचार करतानाच आं-गीं येतात. यूरोपिअन प्रोफेसर लोकांशीं बोलतांना व वागतांना या बाबतींत विद्यार्थीवर्गाच्या चुका होत असतील. प्रोफेसरलो-कांनीं मनावर घेतल्यास विद्यार्थ्यांस वागण्याचा हा सांप्रदाय माहीत होईल, व विद्यार्थ्यांचें वर्तन या बाबतींत प्रोफेसरांचे मनाप्रमाणें होईल. या गोष्टीस फारसें महत्व नाहीं. परंतु विद्या-र्थीवर्ग बरोबर रीतीनें वागत नाहीं असा साहेबलोकांचा समज होण्यास ही गोष्टसुद्धां कांहीं अंशीं कारणीभूत होत असेल, अ-सें असेल तर विद्यार्थ्यांनीं व प्रोफेसरलोकांनीं या गोष्टीकडे लक्ष्य द्यावें व निदान या कारणाकरितां तरी वाईटपणा होऊं देऊं नये. पूर्वीचे प्रोफेसर व कालेजांतील विद्यार्थी यांचें दळणवळण जास्त होतें. हल्लीं तितकें नाहीं. साहेबलोकांशीं त्यांच्या पद्धति प्रमाणें आमचे विद्यार्थी वागत नाहींत यावरून त्याजवर नुसतें रागावण्यांत अर्थ नाहीं. त्यास त्या पद्धतीनें वागण्यास शिकवावें, व नंतर ते मुद्दाम तसें वागले नाहींत तर त्यांचेवर रागावलें असतां चालेल. साहेबलोकांच्या एटीकेटप्रमाणें आह्मी वागलों नाहीं तर आह्मी दांडगे व उद्धट आहोंत असा त्यांचा समज होण्याचा संभव आहे.

इंग्रजसरकारच्या राज्यापासून हिंदुस्थान देशास जे फायदे झाले आहेत त्यांत लोकांस विद्या मिळत आहे व ज्ञानप्राप्ति होत आहे हा मुख्य फायदा आहे. हिंदुस्थानची सर्व विद्या सरकारच्या हातांत आहे. सरकारनी जशी विद्या लोकांस तशी त्यांनीं ग्रहण केली. विलायतेंतील लोकांस जशी विद्या मिळते तशी हिंदुस्थानच्या लोकांस दिली असती तर तसे परिणाम झाले असते. जितका पैसा विलायतेंतील लोकांच्या विद्येकरितां इंग्रज सरकार खर्च करिते तितका पैसा तेच इंग्रज सरकार हिंदुस्थानच्या लोकांच्या विद्येकरितां खर्च करीत नाहीं आईबापांनीं मुलांस वेडी करण्याचें मनावर घेतलें तर मुलें वेडी होतील त्यांस शहाणी करण्याचा प्रयत्न केला तर शहाणी होतील. गरीब लोकांस विद्या फुकट द्यावी हें सरकारचें कर्तव्य आहे. हिंदुस्थानावर सुधारलेल्या इंग्रज सरकारचें राज्य अजमासें शंभर वर्षे आहे तरी अद्याप प्राथमिक शिक्षण फुकट देण्याबद्दल ठरावापलीकडे मजल जात नाहीं. देशांतील लोकांस जशी विद्या द्यावी तशी सरकार देत नाहीं, त्या कामी लोक प्रयत्न करूं लागले तर त्यास अनेक अडचणी येतात, त्यांत मुख्य अडचण पैशाची. लोकांजवळ इतका पैसा नाहीं, सरकारजवळ लोकांपासून घेतलेला पुष्कळ पैसा असून तो विद्येवर खर्च करीत नाहींत, अशी विद्येची या देशांत हेळसांड आहे. विद्येची ज्या ठिकाणीं अशी अनास्था आहे, व लोकांजवळ चांगली विद्या देण्यास पैसा नाहीं त्या ठिकाणीं विद्यार्थीवर्ग तरी चांगला कसा निपजावा हें समजत नाहीं. आम्हांस जी विद्या मिळत आहे, त्या मानानें विद्यार्थ्यांचें वर्तन

राहते. ज्या विद्येपासून विद्यार्थी चांगले होत नाहींत ती विद्या चांगली आहे असें ह्मणतां येणार नाहीं, अगर विद्या चांगली असेल, तिचा परिणाम चांगला होत असेल, परंतु त्यापासून विद्यार्थ्यांच्या आंगांत जे गुण येतात ते परतंत्र देशांतील लोकांत अवगुण आहेत असें राज्यकर्त्यांस वाटत असेल. विद्यार्थ्यांस जशी विद्या मिळावी तशी त्यास मिळत नाहीं हा दोष त्यांचा नव्हे. हा दोष सरकारचा व विद्यार्थ्यांच्या पालकांचा आहे. या गोष्टीकडे लोकांचें लक्ष गेलें आहे, व त्यांनीं हें काम हातांत घेण्याचा विचार केला आहे, व कांहीं ठिकाणीं सुरू केलें आहे.

जीं राष्ट्रें स्वतंत्र आहेत, ज्यांस हत्यारें वापरण्याची मनाई नाहीं, ज्यास लष्करी खात्यांत नोकऱ्या करण्याकरितां मुद्दाम तयार करतात व प्रत्येक गृहस्थानें शिपाईगिरीची व लढण्याची विद्या संपादन केली पाहिजे. ज्या लोकांस दुसऱ्या देशावर राज्य करावयाचें आहे, त्यास जास्त देश व मुलुख संपादन करावयाचे आहेत, ज्या लोकांची शारिरीक व मानसीक शक्ति वाढविण्याकरतां सर्व राष्ट्र व सरकार एकसारखा अव्याहत प्रयत्न करीत असतात. त्याकरतां पैशाचा कितीही खर्च झाला तरी त्याकडे पाहात नाहींत. अशा ठिकाणीं शारिरीक शक्ति वाढविण्याकरतां कितीही संस्था निघाल्या, लोक घोड्यावर बसावयास शिकले, शिकार करण्यास शिकले, व बंदुकीनें नेम मारण्यांत व इतर शस्त्र विद्येंत हुशार झाले, व त्यास राजकीय बाबतींचें कितीही ज्ञान झाले, व त्यांनीं राष्ट्रांतील लोकांची सत्ता वाढविण्याकरतां कितीही प्रयत्न केले व चळवळी केल्या तर त्याबद्दल

त्या लोकांस कोणी दोष देत नाहींत, उलट त्यांचें कौतुक करतात. अशा ठिकाणीं विद्यार्थ्यांनीं राजकीय चळवळींत पडावें किंवा नाहीं असा प्रश्न निघत नाहीं. प्रत्येक अबालवृद्धास आपल्या देशाचा, आपल्या सरकारचा व देशांतील महत्वाच्या सार्वजनीक संस्थांचा विचार करण्याचा हक्क आहे. व त्या सुधारणाकरतां ज्या चळवळी होतात त्यांत विद्यार्थी पडले तर त्यांस कोणी दोष देणार नाहीं, परंतु हिंदुस्थानची स्थिति तशी नाहीं. ज्या गोष्टी विलायतेतील मुलें व विद्यार्थी करतात व तें जसें वागतात त्याप्रमाणें हिंदुस्थानचे विद्यार्थी वागूं लागले व त्याप्रमाणें करूं लागले तर तेंच वर्तन दोषास पात्र होतें.

देशी कपडा वापरावा, सर्व वस्तु देशी वापराव्या. परदेशी मालावर बहिष्कार घालावा. इतकेंच नाहीं तर कोणत्याही गोष्टींत परदेशाचा संबंध असूं नये, ह्मणजे परकीय भाषा शिकूं नये, परकीय भाषा बोलूं नये, परकीय लोक शिक्षक नसावेत, परकीय भाषेंतून ज्ञान न मिळवितां आपल्या स्वदेशी भाषेंतून शिक्षण चालवून ज्ञान मिळवावें; कोणत्याही बाबतींत आपण परकीय लोकांवर अवलंबून राहूं नये, आपल्या देशाचा अभिमान करावा, जें जें आपलें आहे त्याची आवड धरावी, आपला धर्म, आपली विद्या, आपल्या पुरातनकाळच्या संस्था, न्याय करण्याची पद्धत, आपली पूर्वीची राज्य चालविण्याची पद्धत, या सर्वांचें पुनरुजिवन करावें, व आपली विद्या परकीय लोकांच्या हातांत न ठेवितां आपण आपल्या हातांत ठेवावी, त्यांकरतां निराळ्या शाळा व विद्यालयें स्थापन करावी व त्यांच्याशी सरकारचा कांहीं संबंध न ठेवितां त्या संस्था लोकांनीं स्वतंत्रपणें चालवाव्या, व

लोकांस ते राष्ट्रभक्त होतील असें शिक्षण द्यावें. अशा प्रकारचे लेख व व्याख्यानें विद्यार्थी ऐकतात, यामुळें इंग्रजी भाषेंतून कालेजांत व हायस्कूलांत जें शिक्षण मिळतें त्याबद्दल विद्यार्थ्यांची आवड कमी होते. त्या शिक्षणांत त्यांचें मन कमी लागतें. त्यांचा अभ्यास बरोबर होत नाहीं व ज्या ठिकाणीं हें शिक्षण मिळतें त्या ठिकाणाबद्दल त्यास आवड राहात नाहीं. असलें शिक्षण देणारे इंग्रज सरकारचे नोकर यांच्याबद्दलही विद्यार्थ्यांस पूज्य बुद्धि राहात नाहीं. यामुळें विद्यार्थी वर्ग बिघडत चालला आहे. विद्येंत कमी होत चालला आहे. शिक्षक व प्रोफेसर यांच्याबद्दल त्यांच्या मनांतील प्रेमभाव व पूज्यबुद्धि कमी होत चालली आहे. विद्यार्थ्यांस अकालीं आपण फार शहाणे आहोंत असें वाटूं लागलें आहे. व विद्यार्थीवर्ग स्वैर वर्तन करूं लागले आहेत. कालेजांत व शाळेंत असतांना आत्मसंयमन करणें, मनास वाटेल तसें न वागतां सर्व गोष्टींत व्यवस्थित वर्तन ठेवणें, गुरूंच्या आज्ञेंत वागणें, विद्यार्थ्याचें व्रत कडकडींत चालविणें, नियमाप्रमाणें वागणें, व पुढील आयुष्य चांगल्या रीतीनें जाण्याचा पाया घालणें, या गोष्टी होत नाहींत. यामुळें परीक्षा पास झाले तरी विद्यार्थी खरे विद्वान होत नाहींत. व त्यांचें वर्तन पुढेंही लोकांस कित्ता घेण्यासारखें राहात नाहीं, अशी तक्रार ऐकण्यांत येऊं लागली आहे.

सन १८८५ सालीं राष्ट्रीय सभा ह्मणजे इंडियन नॅशनल कांग्रेस—स्थापन झाल्यापासून हिंदुस्थान देशास राष्ट्राचें स्वरूप देऊन व सर्व राष्ट्रानें राजकीय बाबतींत एके ठिकाणीं जमून विचार करावा असा क्रम सुरू झाला. सामाजिक बाबतींत सुधा-

रणा करण्याकरितांही सामाजिक परिषद पुष्कळ वर्षे काम करीत आहे. हिंदुस्तान देशाचे निरनिराळे भाग व त्यांतील लोक एके ठिकाणीं करून त्याचें एक राष्ट्र बनवावें. असा क्रम तेवीस वर्षे चालू आहे. देशास राष्ट्राचें स्वरूप येत चाललें आहे. हिंदुस्तान देश एक राष्ट्र आहे असें समजून त्यांच्या तर्फे राष्ट्रीय सभा सर्व राष्ट्राकरितां राजकीय हक्क मागत आहे. ही सभा सर्व देशास मान्य झाली आहे. प्रजेनें निर्माण केलेलें हें पार्लमेंट आहे. या सभेचा अभिप्राय ह्मणजे देशांतील सर्व लोकांचे लोकमत ह्मणून लोक समजतात.

हिंदुस्थानदेश हें एक राष्ट्र आहे. त्यांतील लोकांकडून जो पैसा सरकार कराचे रूपानें घेतात तो त्या देशाचे फायद्याकरितां खर्च करावा. तो पैसा खर्च करण्यांत देशांतील लोकांस अधिकार असावा, ह्मणजे लोकांस स्थानिक स्वराज्य असावें देशांतील लोकांस सुधारलेल्या राष्ट्रांत जशी विद्या मिळत आहे तशी विद्या द्यावी. त्या कामीं देशाच्या उत्पन्नाचा खर्च करावा. देशाचा व्यापार धंदा व कारागिरी यांचें संरक्षण करावें. या देशांतील लोकांस इंग्रज लोकांप्रमाणें हक्क द्यावें व त्यांस त्यांच्या बरोबरीचे समजून सरकारचें वर्तन त्यांच्याशीं सर्व बाबतींत त्यांच्या प्रमाणें असावें. वगैरे हक्क लोक मागत आहेत. याप्रमाणें देशांतील लोकांच्या मनांत राष्ट्रीयत्वाच्या कल्पना भरत आहेत. त्यांस तेवीस वर्षे पोषण मिळत आहे. या कल्पना ज्यांच्या मनांत बाणल्या आहेत त्यांच्या दोन पिढ्या झाल्या आहेत. व त्यांची मुलें बाळें हल्लीं त्याच कल्पनांत व विचारांत वाढत आहेत. लोकांनीं राष्ट्राची कल्पना करून त्या राष्ट्राची उन्नति करण्याच्या मार्गास लागले आहेत.

सरकार ही गोष्ट कबूल करीत नाहींत. यामुळें देशांत राष्ट्रीय पक्षांच्या ज्या राजकीय चळवळी होत आहेत त्या सरकारच्या विरुद्ध आहेत असा सरकारचा समज झाला आहे. सरकारचा समज असा कीं हिंदुस्थान देश हें एक राष्ट्र नाहीं. निरनिराळ्या लोकांचा व प्रांतांचा एक मोठा जमाव आहे. त्यांस राष्ट्र म्हणून राष्ट्राचे नियम लागू करितां यावयाचे नाहींत. राजकीय दृष्ट्या हें राष्ट्र मानता येणार नाहीं. व या देशांतील लोकांस दुसऱ्या राष्ट्राप्रमाणे अगर कॉलनीप्रमाणें राज्यव्यवस्था देतां येणार नाहीं.

हिंदुस्थानच्या लोकांनीं प्रजा म्हणून रहावें. व इंग्रज लोकानी त्यांच्यावर राज्य करावें. राज्य करणाऱ्या लोकांस जें शिक्षण देण्याची जरूर आहे तें शिक्षण प्रजा म्हणून राहणाऱ्या लोकांस देण्याची जरूर नाहीं. यांत्रिक ज्ञान व्हावें. शास्त्रीय शोध लावण्याची योग्यता यावी. शास्त्रविद्येंत प्रवीणता यावी पंचमहाभूतांवर आपली सत्ता चालवितां यावी व त्याजकडून अनंत शक्तीचीं कामें करून घेतां यावी. सारांश जगांत जशी सुधारलेली राष्ट्रें आपली शक्ति वाढवीत आहेत व दिवसें दिवस वरच्या पायरीस जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. तसेंच आपणास वरच्या पायरीस जाण्याकरितां जें जें शिक्षण जरूर असेल तें लोकांस मिळावें अशी त्यांस इच्छा होत आहे. ही इच्छा हिंदुस्थान देशांत हल्लीं मिळणारे शिक्षणानें पुरी होत नाहीं. अशा प्रकारचें शिक्षण सरकाराकडून मिळालें नाहीं तर त्या करतां वाट पाहूं नये. हें काम लोकांनीं आपल्या शिरावर घेऊन सुरू करावें. हिंदुस्थानचे लोक बुद्धिमान आहेत. ते सुधारलेले

आहेत व त्यांची जास्त सुधारणा करतां येईल. त्यांस चांगलें शिक्षण मिळालें तर ते सुधारलेल्या कोणत्याही राष्ट्रांतील लोकांच्या बरोबरीस येतील. हिंदुस्थानदेश एकराष्ट्र होण्यास योग्य आहे. तसें राष्ट्र बनत चाललें आहे. त्याचा कारभार स्वतंत्ररीतीनें पाहाण्यांस लोक तयार झाले पाहिजेत. व त्या राष्ट्राचा स्वतंत्रपणें विचार करण्याची शक्ति त्या राष्ट्रास आली पाहिजे. कालांतरानें हिंदुस्थानें देशाचा व इंग्लंड देशाचा कॉलनी सारखा संबंध होणार आहे. व तसें झाले असता व तसें होण्यास राष्ट्राच्या आंगीं राष्ट्रीयत्वाचे जे मर्दानी गुण लागतात ते सर्व गुण लोकांच्या आंगीं जेणेंकरून येतील अशा प्रकारचें शिक्षण लोकांस मिळालें पाहिजे असें कांहीं लोकांस वाटूं लागलें आहे.

हिंदुस्थानांतील लोकांनीं प्रजा व्हावें, व इंग्रज लोकांनी राज्य करावें अशी जी वाटणी करून घेतली आहे त्यास वर लिहिलेलें शिक्षणाची कल्पना कबूल होणार नाहीं, असें समजून कांहीं लोकांनीं या शिक्षणास राष्ट्रीय शिक्षण अगर राष्ट्र बनविणारें, व तें राष्ट्र स्वतंत्र करणारें व त्याचा बचाव करणारें असें शिक्षण असें नांव दिलें आहे.

हिंदुस्थानचे लोक इंग्रज लोकांच्या बरोबरीस कधींही लागावयाचे नाहींत, हिंदुस्थान देश कधींही राष्ट्र या पदवीस जाणार नाहीं व राष्ट्राचे हक्क हिंदुस्थानांतील लोकांस कधींही देतां येणार नाहींत व ते राष्ट्र कोलनीच्या नमुन्यावर करतां येणार नाहीं; हा सिद्धांत खरा असेल तर हिंदुस्थानांतील लोकांस निरंतर ते कोणाच्या तरी अमलाखालीं राहणारे लोक असें

समजून हल्लीं मिळत आहे यापेक्षां जास्त शिक्षण देण्याची जरूर नाहीं. प्रजा या नात्यानें सेवाधर्म कसा चालवावा सेवकांस योग्य गुण कोणते आहेत तें ठरवून तितके अंगीं येण्याकरतां, कायम राहण्याकरतां व त्यांची वाढ होण्याकरतां जितकें व ज्या प्रकारचें शिक्षण देणें जरूर असेल तितकें दिलें ह्मणजे पुरें होईल; परंतु ही कल्पना सोडून या देशांतील लोकांस इंग्रज लोकांसारखी कामें व कर्तव्यें करावयाचीं आहेत. व तो त्यांचा हक्क आहे असें मानिलें ह्मणजे या देशांतील लोकांस राष्ट्रीयत्व येणारें शिक्षण मिळणें जरूर होतें. या बाबतींत इंग्रज लोक व हिंदुस्थानचे लोक यांचा मतभेद झाला आहे, व स्वराज्यास योग्य व स्वराज्य मिळण्याकरतां राष्ट्रीय शिक्षणाची जी कल्पना कांहीं लोकांनीं केली आहे ती इंग्रज लोकांस कादंबरीसारखी वाटत आहे. असा शिक्षणाचे बाबतींत लोकांचा व सरकारचा मोठा मतभेद झाला आहे. बंगाल्यांतील लोकांनीं राष्ट्रीय शिक्षण सुरू केलें आहे, व तें राष्ट्राच्या हातांत ह्मणजे लोकांच्या हातांत राहावें असा त्यांचा हेतु आहे. सरकारी शिक्षण वेगळें व राष्ट्रीय शिक्षण वेगळें असा त्यांनीं भेद केला आहे. सरकारी शिक्षण सरकारची प्रजा सेवक या नात्यानें सेवक करणारें व राष्ट्रीय शिक्षण राष्ट्राची प्रगति करणारें ह्मणजे आज मितीस जे लोक दुसऱ्यांचे दास आहेत ते वालनींतील लोकांप्रमाणें यजमानाचे पदवीस नेणारें आहे असें कांहीं लोकांचें मत आहे.

इंग्रज सरकारचाही हेतु आह्मांस निरंतर दास्यत्वांत ठेवण्याचा नाहीं. लोकांचाही बेत तसाच झालेला दिसतो. सरकार आमची सुधारणा हळु हळु इतर महत्वाच्या कामाच्या

सवडीप्रमाणें व पैशाच्या सवडीप्रमाणें करणार आहे, पण त्यास फार वेळ लागेल, असें पाहून शिक्षणासंबंधीं व्यवस्था लोकांनीं आपल्या हातीं घेतली, व सरकारचा व लोकांचा हेतु सिद्धीस नेण्यास लोक झटूं लागले आहेत. सरकार व प्रजा यांच्या दरम्यान शिक्षणासंबंधीं जो वाद आहे, त्याची बातमी हायस्कुलांतील जाणत्या विद्यार्थ्यांस व कालेजांतील विद्यार्थ्यांस लागली आहे. सरकारी शिक्षणापेक्षां राष्ट्रीय किंवा कांहीं लोकांनीं जें शिक्षण देण्याचें योजिलें आहे तें शिक्षण बरें आहे, असें विद्यार्थ्यांस वाटतें. त्यांच्या पालकांचा, आईबापांचा, शेजाऱ्यापाजाऱ्यांचा व इष्टमित्रांचा असाच समज झाला तर सरकारी शिक्षणावर विद्यार्थ्यांची भक्ति राहणार नाहीं. विद्यार्थीवर्ग या राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेंत सांपडलेला आहे, त्याचा परिणाम त्यांच्या मनावर व वर्तनावर झाल्यावांचून राहावयाचा नाहीं.

ज्या प्रकारचें शिक्षण लोकांस पाहिजे आहे तसें शिक्षण देण्याची सोय सरकार करीत गेलें, त्याकरतां लागणाऱ्या खर्चांत कंजूषपणा केला नाहीं, ह्मणजे लोकांस विश्वास येईल व राष्ट्रीय शिक्षण वेगळें व सरकारी शिक्षण वेगळें असा लोकांचा समज राहणार नाहीं.

सुधारलेल्या राष्ट्राकडे व विशेषंकरून इंग्लंड देशाकडे पाहिलें असतां असें दिसून येईल कीं त्या देशांत विद्या, धन व दुसऱ्या लोकांवर सत्ता हीं एक सारखीं वाढत आहेत. किंबहुना विद्या, धन व सत्ता हीं राष्ट्राचीं उन्नति करणारीं तीन मोठालीं साधनें आहेत. हिंदुस्थान देशास या तिहींचा त्रिदोष झालेला

आहे. इंग्लंड देशास या तिन्हीं गोष्टी कितीही मिळाल्या तरी त्यांची तृप्ती व्हावयाची नाहीं. कारण दुनियेंत त्यांस जीं कामें करावयाचीं आहे. तीं फार अकलेचीं, जबाबदारीचीं व खर्चाचीं अशीं आहे, त्यास सर्व प्रकारची विद्या संपादन करून द्रव्य संपादन करावयाचें आहे. द्रव्य संचय करून विद्येची व व्यापार धंद्याची वाढ करून सत्ता संपादन करावयाची आहे. राज्यें मिळवावयाचीं आहेत. तीं राखावयाचीं आहेत. कोट्यावधी लोक आपल्या सत्तेखालीं ठेवून त्यांच्यावर कर बसवून द्रव्य निर्माण करावयाचें आहे दिवसें दिवस जितकें वरच्या पायरीस जातां येईल तितकें जावयाचें आहे असलीं महत्वाचीं कामें ज्या लोकांस करावयाचीं आहेत त्यांस शिक्षण ही तसेंच उत्तम प्रकारचें मिळालें पाहिजे. त्याकरितां कितीही खर्च झाला तरी फुकट जाणार नाहीं. लहान पणापासून वर लिहिलेल्या कार्यास जरूर असे गुण मुलांच्या आंगीं यावें अशा प्रकारचें शिक्षण त्यांस मिळत असतें. असें शिक्षण मिळण्याचा त्यांचा हक्क आहे. तें न मिळालें तर त्या देशाचा कमीपणा होईल.

हीं कार्यें करण्याची हिंदुस्थानांतील लोकांस जरूर नाहीं. त्यांच्याकरितां जबाबदारीचीं व मेहनतीचीं व अकलेचीं, व शाहाणपणाचीं सर्व कामें करण्यांस इंग्रज लोक शिकत आहेत व तीं कामें मनापासून करीत आहेत. यामुळें इंग्रज लोकांच्या मुलांस–विद्यार्थ्यांस–ज्या प्रकारचें शिक्षण मिळतें त्या प्रकारचें शिक्षण देण्याची जरूर राहत नाहीं.

इंग्रज सरकारच्या रामराज्यांत हिंदुस्थानांतील लोकांस जीं कामें करावयाचीं आहेत अगर जीं त्यांस परमेश्वर कृपेनें करावीं

१९१६९

लागत आहेत, तीं कामें करण्यास जरूर तें सर्व शिक्षण इंग्रज सरकार करीत आहेत. कालेजांत शिकलेले, व [illegible] न आलेले कांहीं इसमांच्या नेटीवांच्या [illegible] लायकी-बद्दल कल्पना वाढल्या आहेत इंग्रज लोक व आपण सारख्या योग्यतेचे आहोत. त्यांचे व आपले हक्क सारखे आहेत. आपल्या मुलांस त्यांच्या प्रमाणें शिक्षण मिळालें पाहिजे. व आपण ही कांहीं दिवसांनीं कालनीच्या नमुन्यावर स्वराज्य करण्यास तयार झालें पाहिजे, व मुख्य सरकारास नुसतें ओझें ह्मणून न राहतां त्यास आपली खरी मदत झाली पाहिजे. व सार्वभौम-सत्तेखालीं आपल्यास स्वराज्याचे सर्व हक्क मिळून आपणांत आपल्या देशाचा कारभार पाहतां आला पाहिजे. अशा प्रकारचें महत्कार्य डोळ्यापुढें ठेवून लोक त्या मार्गानें जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. या कार्यास लागणारें शिक्षण सरकार देऊं लागलें तर सरकार व राष्ट्र यांच्या दरम्यान कांहीं विरोध राहणार नाहीं. व आमच्या विद्यार्थ्यांस ही कोणत्याही प्रकारची तक्रार करण्यास जागा राहणार नाहीं व विद्येंतून त्याचें मन कमी होणार नाहीं योग्य विद्या व ज्ञान दिल्याबद्दल ते सरकारास दुवा देतील व इंग्रज सरकारचें राज्य चिरायू हावो व हिंदुस्थान व इंग्लंड यांचा संबंध चिरकाल राहो अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करतील.

REFBK-0019179